
MAHMARI 19358/13/1/2000 - TC



विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.
# दिशा

वर्ष पंचविसावे / अंक ८ / ऑगस्ट २०२४

## संपादकीय

### औपचारिकतेचा अतिरेक

लहान मूल जात्याच जिज्ञासू असते. मिळेल त्या वस्तूला स्पर्श करून अनुभव घेणे, त्याची चव बघणे, ती वस्तू आपटली तर काय होते हे पाहणे, अशा अनेक गोष्टी ते मूल करीत असते. त्यातून त्या वस्तूचे गुणधर्म त्याला कळतात. हे मूल घरातील मोठी माणसे कसे वागतात याचे बारकाईने निरीक्षण करीत असते. त्यातून आजूबाजूच्या व्यक्तीशी कसे वागावे याचे आराखडे ते बांधत असते. याहीपेक्षा महत्त्वाचे निरीक्षण बालक करते ते बोलण्याचे! मोठी माणसे एकमेकांशी काय संभाषण करतात याचे निरीक्षण करून ते मूल भाषा अवगत करते. त्याला सर्वात आधी आजूबाजूला असलेल्या अनेक वस्तू आणि पदार्थांच्या नावांची माहिती होते. त्या नावांचा ते पुनरुच्चार करून बघते. मोठ्याने बोलून उच्चार बरोबर असल्याची खात्री करून घेते. याच पद्धतीने त्याला सर्वनामे, विशेषणे आणि क्रियापदांची माहिती होते. नकळतपणे त्याच्या घरात बोलली जाणारी भाषाही हे बालक सहज साध्य करते.

वर सांगितलेल्या अनौपचारिक मार्गाने मूल जगाची ओळख करून घेत असते. हे शिक्षण सहजसुलभ असते आणि नैसर्गिकपणे होत असते. मुलाला बालवाडीत घातल्यानंतर मात्र यात खंड पडतो. या बालकांवर बालवाडीत गेल्यापासून औपचारिक शिक्षणाचा मारा केला जातो. ए, बी, सी, डी पाठ करण्याची आणि ते पुन्हा पुन्हा लिहून काढण्याची त्यांच्यावर सक्ती केली जाते. साधारणपणे मूल ३ वर्षांचे झाले, की त्याला बालवाडीत घालतात. या वयात त्यांचे हात पेन्सिल धरायला आणि अक्षर गिरवायला सक्षम नसतात असे वैद्यकीय व्यवसायातील लोकांचे मत आहे. त्यामुळे या वयात मुलांना खेळ, गाणी यात गुंतवून ठेवावे असे बालशिक्षण-तज्ज्ञ सांगतात. तरीही अनेक बालवाड्या ह्या लेखनाचा आग्रह धरताना दिसतात.

बालवाडीत सुरू झालेले औपचारिक शिक्षणाचे चक्र शिक्षण पूर्ण होईपर्यंत सुरूच राहते. परीक्षेत विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मॉडेल ॲन्सरशी (Model Answer) मिळती-जुळती असतील तरच गुण मिळतात. 'आपले ज्ञान वापरून उत्तर दिले तर शून्य गुण मिळतात' हे त्यांच्या लवकरच लक्षात येते. त्यामुळे प्रश्न आणि उत्तर पाठ करण्याचा सोप्पा मार्ग ते स्वीकारतात. असे करण्याने संकल्पना तर कळतच नाही; उलट 'पुढे पाठ, मागे सपाट' अशी अवस्था होते. परीक्षा संपली की पाठ केलेले विसरले जाते! कोचिंग क्लासेस यात महत्त्वाची भूमिका बजावतात. सराव

(मुखपृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

परीक्षेचा तिथे एवढा अतिरेक केला जातो की, विद्यार्थी यंत्रवत कार्य करू लागतात! त्यामुळे परीक्षेत वेगळ्या पद्धतीने प्रश्न विचारला गेला की या मुलांचा गोंधळ उडतो.

औपचारिकतेचा प्रभाव संशोधनाच्या क्षेत्रात देखील पाहायला मिळतो. संशोधन कसे करावे याचा एक ठरावीक ढांचा तयार झाला आहे. त्याच पायऱ्यांनी काम करावे अशी अपेक्षा असते. आपले संशोधन सादर करण्यासाठी देखील आखून दिलेल्या मार्गानेच जावे लागते. पिच.डी. मिळविण्यासाठी प्रबंध कसा लिहावा याचा एक आराखडा असतो. त्याचे पालन करावे लागते. संशोधन प्रसिद्ध करणाऱ्या पत्रिका देखील एका विशिष्ट शैलीत लिहिलेल्या लेखांची मागणी करतात. त्यामुळे संशोधकाला आपल्या निसर्गदत्त शैलीचा वापर करता येत नाही. अशा पद्धतीने सर्वत्र औपचारिकतेचा अतिरेक झाल्यामुळे विद्यार्थ्यांची जिज्ञासा मारली जाते. त्याहीपेक्षा मोठा प्रभाव पडतो तो त्याच्या नवनिर्मिती क्षमतेवर! त्यामुळे विद्यार्थी संख्या मोठी असूनदेखील आपल्या देशात नवनवीन कल्पनांची म्हणावी तशी निर्मिती होत नाही.

काही वर्षांपूर्वी माझ्या वाचनात एक पुस्तक आले. ते पुस्तक एका संशोधन प्रकल्पावर आधारलेले होते. शालेय शिक्षण आणि सामाजशिक्षण यापैकी कशाचा प्रभाव विद्यार्थ्यांच्या जीवनावर जास्त होतो हे समजून घेण्यासाठी इंग्लंडमधील दोन संशोधकांनी एक संशोधन प्रकल्प हाती घेतला होता. त्या संशोधन प्रकल्पाचे निष्कर्ष त्यांनी ‘फिफ्टीन थाउजंड अवर्स’ (Fifteen Thousand Hours) नावाच्या पुस्तकातून प्रकाशित केले. त्यांचा मते, मूल शाळेत जायला लागल्यापासून शालेय शिक्षण संपेपर्यंत ते साधारणपणे १५ हजार तासांचा कालावधी शाळेत व्यतीत करते. बाकीचा वेळ हे मूल कुटुंबात आणि समाजात व्यतीत करते. यातून देखील त्या मुलाचे शिक्षण होत असते. त्यांनी मिळविलेल्या माहितीचे विश्लेषण केल्यावर त्यांच्या असे लक्षात आले की, शाळेतील औपचारिक शिक्षणापेक्षा शालाबाह्य शिक्षणाचा प्रभाव विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्त्वावर जास्त पडतो.

वर दिलेले निरीक्षण पालकांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे आहे. औपचारिकता ही शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षणाची गरज असेल तर त्यांना तसे करू द्या; पण आपण मात्र आपल्या मुलांना शक्य तितक्या अनौपचारिक शिक्षणाच्या सुविधा पुरविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ‘मुलांना शाळेत आणि कोचिंग क्लासमध्ये घातले की आपली जबाबदारी संपली’ असे अनेक पालकांना वाटते. ते पूर्णतया चुकीचे आहे. जेव्हा जेव्हा शक्य असेल तेव्हा तेव्हा आपल्या पाल्यांना अनौपचारिक शिक्षणाची संधी मिळवून देणे हे प्रत्येक पालकाचे कर्तव्य आहे. शक्य असेल तेव्हा आपल्या मुलांना वस्तू संग्रहालयात घेऊन जावे. तिथे असलेल्या वस्तू पाहून आणि त्याबद्दलची माहिती वाचून त्यांच्या ज्ञानात भर पडेल. एखाद्या वाचनालयाचे सभासदत्व घेऊन तेथून वेगवेगळ्या विषयांवरची पुस्तके घरी आणावीत. त्या पुस्तकातील माहितीवर घरात चर्चा करावी. वादविवाद झाले तरी बेहत्तर; परंतु प्रत्येकाला आपले मत मांडण्याची मुभा असावी. यातूनच आपले मत इतरांना पटवून देण्याचे कौशल्य मुले आत्मसात करतात. अनेक पालक मुलांना सुट्टी पडली की सहलीला घेऊन जातात. ‘सहल’ हे शिक्षणाचे प्रभावी असे माध्यम आहे. आपण भेट दिलेल्या ठिकाणाचे भौगोलिक महत्त्व काय याची माहिती त्यांना द्यावी. तिथे असलेल्या वनस्पती, प्राणी, पक्षी यांची माहिती देऊन त्यांना जैव विविधतेचे प्रत्यक्ष धडे देता येतात. आजूबाजूला घडणाऱ्या घटनांचे निरीक्षण करून कितीतरी नवीन ज्ञान त्यांना मिळविता येते. अशा बारीकसारीक गोष्टींचे शैक्षणिक संधीत रूपांतर करणे सहज शक्य आहे; याचा पालकांनी गांभीर्याने विचार करावा.

**– डॉ. सुधाकर आगरकर**

व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष पंचविसावे/अंक ८/ऑगस्ट २०२४

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २९ वे/अंक २ ला)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**
**vpmt1935@gmail.com**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | फेमिनिझम ते वोकिझम - एक अंधारयात्रा | रवींद्र मुळे | २ |
| ३) | पर्यावरणस्नेही अणुऊर्जा | नरेंद्र गोळे | ५ |
| ४) | फ्रान्समधील सद्यस्थिती व फ्रेंच राज्यक्रांती पुस्तक | जयंत कुलकर्णी | १२ |
| ५) | गुन्हेगारी साहित्यविश्वाचा विक्रमादित्य सम्राट : मायकल कॉनली | हेरंब ओक | १३ |
| ६) | उंटांची अदभूत रम्य दुनिया २०२४ हे आंतराष्ट्रीय कॅमेलीड्सचे वर्ष | सौ. अल्पना बापट | २३ |
| ७) | परिसर वार्ता | संकलित | २७ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# फेमिनिझम ते वोकिझम - एक अंधारयात्रा

*नुकत्याच सुरू झालेल्या ऑलिम्पिकमध्ये अल्जेरिया देशातील महिला बॉक्सर खेलीफ (?) (का त्याला) महिला गटात प्रवेश मिळाला आणि इटलीच्या अंजेलोने ४६ सेकंदात सामना सोडून दिला. याचे मुख्य कारण तिने खेलीफ यांच्या बायोलोजिकल फरक आणि ट्रान्स जेंडर याचे दिले आहे. या वोककल्चर संदर्भातील जागतिक विषयावर प्रस्तुत लेख- संपादक*

ऑलिंपिक खेळ सुरू झाले आहेत. क्रीडा क्षेत्राच्या माध्यमातून जगाला जोडण्याचा एक गेल्या शतकात उदयाला आलेला अभिनव उपक्रम आहे. जगभर प्रसिद्ध पावणाऱ्या या महोत्सवात सर्वच देशांतले क्रीडापटू आपले कौशल्य दाखवत त्या त्या क्रीडा प्रकारात आपले नैपुण्य, वर्चस्व दाखवण्यासाठी जीवनभर प्रयत्न करत असतात.




अशा या महोत्सवाला उद्घाटन सत्रापासून एक जगभर घोंघवणाऱ्या वादळाने ग्रासून टाकले आहे. कुणा एकेकाळी याच क्रीडामहोत्सवात दहशतवादाने प्रवेश केला होता आणि मग हळूहळू जगभर या दहशतवादाने थैमान घातले. आता एका अशाच अ-मानवी विचारसरणीची काळी छाया या महोत्सवावर पडली आहे. जगभरातील विवेकी वृत्तीने जर वेळीच याची दखल घेतली नाही, तर संपूर्ण मानवी संस्कृती पुढे एक आव्हान उभे राहणार आहे.

कुणे एकेकाळी स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ह्या विचाराने जिथे फ्रेंच राज्यक्रांती उदयाला आली, त्याच भूमीवर स्वातंत्र्याने स्वैराचारापुढे आपली मान टाकल्याची दुर्दैवी स्थिती पहावी लागत आहे आणि हे खूप भयावह आहे.

स्त्री आणि पुरुष यामध्ये असणारे नैसर्गिक भेद हे मानवी जीवनाला पुढे नेणारे आहेत असा सांस्कृतिक विचार न करता, ज्या तत्त्वज्ञानाने स्त्री हे पापाचे प्रतीक आहे असे म्हणायला सुरुवात केली त्यावेळी ह्या बायबल प्रणित तत्त्वज्ञानाच्या विरोधात एक चळवळ उभी राहिली आणि तिचे नामकरण 'स्त्रीवादी चळवळ' (फेमिनिझम) असे दिले गेले. जसजशी ही चळवळ पुढे गेली तसतसे तिचे स्वरूप प्रत्येक देशात बदलत गेले.

भारतात वास्तविक आमच्या विचारात अर्धनारी नटेश्वर ह्या संकल्पनेत सुरुवातीपासून स्त्री / पुरुष ह्यांच्या नैसर्गिक भेदाला एक वेगळे उदात्त स्वरूप देण्यात आले होते. पण आमच्या विचाराच्या मागील आमची शक्ती दुर्बळ झाल्याने जगात जे विकृत विचार फोफावले त्यातून केवळ भौतिक गोष्टींचा विचार करणाऱ्या पाश्चात्त्य देशात स्त्रीवाद, स्त्री मुक्ती हे विचार फोफावले आणि मग भारतात देखील त्याचा शिरकाव झाला. स्वतःला डावे, पुरोगामी म्हणणाऱ्या लोकांनी जाणीवपूर्वक हा विचार रुजवला. त्यातून भारतीय स्त्री दृष्टीचा प्राकृत विचार मागे पडत अनेक विकृती जन्माला आल्या. त्यातूनच आज आपल्या कुटुंब व्यवस्थेची उद्ध्वस्त होण्याच्या दिशेने दुर्दैवी वाटचाल सुरू आहे.

---

आपल्या दोषांवरचे उपाय नेहमी आपल्याकडेच असतात; फक्त ते शोधण्याची तसदी घ्यावी लागते...

पण फेमिनिझमची सुरू झालेली वाटचाल इथेच थांबणार नव्हती. स्वातंत्र्याचे रूपांतर स्वैराचार करण्यात होत असताना, जगभरातील त्याला खतपाणी घालण्याचे काम ग्लोबल मार्केटिंग फोर्सेसवाल्यांनी कसे केले याची अनेक उदाहरणे आहेत. पुरुष केंद्रित उत्पादने ही स्त्रियांनी वापरली तर आपली बाजारपेठ दुपट्ट होईल या शुद्ध बाजारी विचाराने स्त्री-वादाला उचलून धरले. (उदाहरणार्थ 'स्त्री'ने सिगारेट पिण्यास हरकत नाही अशा जाहिराती सुरू झाल्या) या सगळ्याचा परिणाम म्हणजे प्राकृत अवस्थेतून आम्ही विकृत अवस्थेकडे जाऊ लागलो.

आता याच मालिकेत एका आणखी भयानक विचाराने जन्म घेतला आहे आणि तो म्हणजे, 'स्त्री काय, पुरुष काय' किंवा अगदी टोकाला जाऊन 'मनुष्य काय आणि कुत्रे, मांजर काय ?' हे वर्गीकरण करण्याचे अधिकार कुठल्याच व्यवस्थेला नाहीत. हे अधिकार कुठल्या समाज व्यवस्थेला देणे म्हणजे त्या जीवमात्राच्या स्वातंत्र्यावर घाला घालणे आहे आणि त्यामुळे अशी बंधने जी व्यवस्था तुमच्यावर लादते ती व्यवस्था तुम्ही नाकारली पाहिजे किंबहुना अशी सामाजिक व्यवस्था ही अ-मानवी आहे असे तत्त्वज्ञान वोकिझम नावाने सांस्कृतिक मार्क्सवादी मंडळीनी जन्माला घातले आहे.

नेहमीप्रमाणेच या तत्त्वज्ञानाला उचलून धरले आहे ते डाव्या म्हणवून घेणाऱ्या सर्वच कम्युनिस्ट विचाराने. पण यावेळी त्यांनी स्वतःच्या तत्त्वज्ञानाला 'सांस्कृतिक मार्क्सवाद' असे बिरूद लावून घेतले आहे. कामगार आणि कारखाने यातून निर्माण होऊ घातलेली तथा कथित क्रांती कधीच, कुठेच यशस्वी झाली नाही, प्रत्यक्षात आली नाही. किंबहुना चीन, रशिया सारख्या देशांना उत्कर्षासाठी राष्ट्रवाद, भांडवलवादी विचाराचा आसरा घ्यावा लागला.

पण मग रूप बदलून हे तथाकथित क्रांतिकारी नवीन वर उल्लेखलेल्या तत्त्वज्ञानाला वोकिझम या गोंडस नावाने फोफवण्याचा प्रयत्न करत आहेत. आणि याचेच दृश्य स्वरूप काल ऑलिंपिक स्पर्धेत महिला बॉक्सिंग क्रीडा प्रकारात बघायला मिळाले आहे.

घडले असे की, अल्जेरिया देशातील महिला बॉक्सर खेलिफ ही (?) गेल्यावर्षी नवी दिल्ली येथे झालेल्या महिला आंतरराष्ट्रीय बॉक्सिंग मध्ये डीएनए टेस्ट केल्यावर सर्व अटी पूर्ण करू शकली नाही आणि त्याचे कारण ट्रान्स जेंडर हे होते असे सांगण्यात आले. पण ऑलिंपिक मध्ये तिला ( का त्याला ) महिला गटात प्रवेश मिळाला आणि इटलीच्या अंजेलोने ४६ सेकंदात सामना सोडून दिला. याचे मुख्य कारण तिने खेलीफ यांच्या बायोलोजिकल फरक आणि ट्रान्स जेंडेर याचे दिले आहे.

या घटनेला म्हणजे खेलिफला प्रवेश देण्यास आणि नंतरच्या घडामोडीचा ट्रम्प, अलन मस्क ते इटलीच्या पंतप्रधान सर्वांनी निषेध नोंदवला आहे. पण केवळ निषेध नोंदवून भागणार नाही. वोकिझमचा हा मानवी मूल्ये गिळू पाहणारा अजगर ठेचायचा असेल तर जगभरातून त्यासाठी प्रामाणिक योजनापूर्वक प्रयत्न करावे लागतील.

बॉक्सिंग मध्ये घडलेल्या या प्रकाराला पार्श्वभूमी या अगोदर २६ जुलै रोजी पॅरिस ऑलिंपिकच्या उद्घाटनाची पण आहे. मानसिक रोगी झालेल्या या वोकिझमवाल्या मंडळीनी या उद्घाटन सोहळ्याचा संपूर्ण ताबा घेतला होता हे बघताना दिसत होते. पुरुष वेशातल्या स्त्रिया आणि स्त्री वेषातील पुरुष आणि त्यांचे विकृत लैंगिक चाळे याने व्यापलेल्या या सोहळ्यात कुठेही फ्रान्स देशाच्या संस्कृती, परंपरा यांचे दर्शन नव्हते. दिसत होती ती पूर्णपणे मानसिक विकृत मंडळींची उद्दाम शारीरिक हालचाल.

जगभरातील लोकांनी हे बघितले आहे. याविरुद्ध धर्म, पंथ, परंपरा आणि मूळ संस्कृतीचे वाहक मूग गिळून बसले आहेत ही ह्या विषयाची दाहकता अधिक वाढवणारी आहे. पोप हे नावालाच आहेत का? ते का या गोष्टीचा निषेध करायला उभे राहत नाहीत? की चर्च व्यवस्था देखील सोरास सारख्या भांडवलदारांच्या घरी पाणी भरायला गेली आहे ?

या निमित्ताने वोकिझमचा हैदोस सर्व क्षेत्रांत कसा प्रभाव टाकू लागला आहे हे जगाच्या समोर आले आहे. लिंग बदल हा अलीकडे पाश्चात्त्य देशात सर्वांत मोठा व्यवसाय होऊ पाहत आहे. जगभरात मनुष्याची लोकसंख्या घटण्यास यामुळे सुरुवात झाली आहे. LGBTQ ची मालिका आणखी किती लांबणार आहे याची कुणीही खात्री देत नाही. कुठले कपडे घालायचे? पुरुषांचे कपडे आणि स्त्रियांचे कपडे असे वर्गीकरण का? सलून पासून पब्लिक टॉयलेट पर्यंत सर्व काही जेंडर मुक्त करण्याची एक मोहीमच जगभर चालू झाली आहे.

बर्लिन मध्ये कुत्रे झालेली माणसे एकत्र आली होती ही घटना फार जुनी नाही. मनुष्य जन्म मिळाल्यावर देखील स्वतःला प्राणी मानणे म्हणजे विकृत चाळे कुठेही करण्याचे लायसन मिळवणे आहे आणि हेच वोकिझम नावाचे तत्त्वज्ञान आहे.

माणसाला पुन्हा रानटी अवस्थेकडे नेणारी ही व्यवस्था, हा विचार गतीने जगभर लोकप्रिय होत असताना भारतातही डाव्यांची जहागीरदारी बनलेली विद्यापीठे या वोकिझम तत्त्वज्ञानाला प्रोत्साहन , खतपाणी घालत आहेत. या तत्त्वज्ञानाला विरोध करणाऱ्यांना संस्कृती रक्षक म्हणून हिणवणारे रस्त्यावर येऊन निर्लज्ज पद्धतीने रस्त्यावर लैंगिक चाळे करताना काही वर्षांपूर्वी आम्ही दिल्लीत बघितले होते. भारतात याची लागण झपाट्याने होत आहे.

या गोष्टी रोखण्यासाठी सगळ्यांनी पुढे येऊन वेळीच आवर नाही घातला तर संपूर्ण मानव वंशाला निकालात काढणारा हा एक नवा डायनासोर तयार झालेला आपल्याला दिसल्याशिवाय राहणार नाही.

स्त्रीवादी (फेमिनिझम) चळवळ कुटुंब व्यवस्था गिळंगृत करू पाहत होती; तर वोकिझम संपूर्ण समाज व्यवस्थाच गिळू पाहत आहे. ही सगळी अंधार-यात्रा जगभरातील तथाकथित पुरोगामी, डावे यांनी आपल्या शिरावर वाहून नेण्याची जबाबदारी उचलली आहे. केवळ व्यापार आणि व्यापार उद्दिष्ट ठेवून काही मंडळी या विचाराला नेहमीच प्रोत्साहन देत आले आहेत. ज्यांचे धार्मिक अनुबंध घट्ट आहेत ते कट्टरवादी मुस्लीम या वादळाचे स्वागतच करणार आहेत, कारण त्यांना माहिती आहे त्यांचे धार्मिक कवच त्यांचे फार नुकसान करणार नाही. या वादळाचा सामना करण्यासाठी कदाचित उद्या चर्च व्यवस्था अधिक कट्टर होईल ! पण आम्हा हिंदूंचे काय ?

पुरोगामित्वाचा बुरखा घेऊन हिंदू संस्कृती, हिंदू विचार उद्ध्वस्त करणारी वृत्ती, शक्ती सर्व स्तरांतून ठेचून काढण्याची वेळ आली आहे. मानवी मूल्यांचे रक्षण फक्त हिंदू विचारात आहे. ह्या पाश्चात्त्य देशातून सुरू झालेल्या अंधारयात्रेत लुकलुकणारा काजवा, आशेचा किरण फक्त आमचा मूलभूत हिंदू विचार आहे. तो विचार जागवण्यासाठी, जगवण्यासाठी कटिबद्ध होण्याची वेळ आली आहे. विमर्शची लढाई आता आरपारची लढाई आहे.

**– रवींद्र मुळे**
अहिल्यानगर
भ्रमणध्वनी : ९४२२२२१५७०


•••

स्वतःची तुलना इतरांबरोबर करू नका; तसे केल्यास तुम्ही स्वतःचा अपमान करता आहात!

# पर्यावरणस्नेही अणुऊर्जा

*ज्येष्ठ संशोधक व वैज्ञानिक श्री नरेंद्र गोळे यांचा 'पर्यावरण स्नेही अणुऊर्जा' या विषयावरील अत्यंत उद्बोधक लेख - संपादक*

न्यू मेक्सिकोतील अल्बुकर्कच्या दक्षिणेस १२० मैलांवरील अमेरिकेच्या अलामागार्डो भूदलाच्या, बिकिनी बेटावरील हवाई तळावरील एका उंच लोखंडी मनोऱ्यावर, स्थानिक वेळेनुसार, १६ जुलै १९४५ रोजी सकाळी ०५३० वाजता, जगातील पहिला ज्ञात अणुस्फोट करण्यात आला. मनोऱ्याभोवती विविधप्रकारची वैज्ञानिक वेध घेणारी साधने ठेवलेली होती. मात्र, स्फोटामुळे संपूर्ण मनोऱ्याची वाफ झाली आणि स्फोटाबाबतची नोंद करणारी बहुतेक सर्व सामुग्रीही हवेत विरून गेली. स्फोटाने ८०० यार्ड परिघातील वाळवंटाचा पृष्ठभाग बेचिराख केला. वाळू वितळवून, कठीण, ठिसूळ आणि काचेगत दिसणाऱ्या आणि वाटणाऱ्या हिरव्या पदार्थात गोठवून टाकली[1].



अणुस्फोट होतो तेव्हा असंख्य अणुंची अगणित किरणोत्सारी छकले तयार होतात आणि ही छकले आपापल्यापरीने पर्यावरणास किरणोत्सारी करत राहतात. ती मनुष्य मात्रांकरता अत्यंत धोकादायक असतात. वेगवेगळ्या प्रकारच्या व्याधी आणि विकार निर्माण करू शकतात.

अमेरिकेने पहिला चाचणी अणुस्फोट बिकिनी बेटावर घडवला होता. या अणुस्फोटात खूप किरणोत्सार निर्माण झाला. तो दूरवर विखुरलाही गेला, कारण एका उंच मनोऱ्यावर अणुस्फोटके ठेवून त्यांचा स्फोट घडवून आणलेला होता. तो किरणोत्सार सगळीकडे विखरून वातावरण प्रदूषित झाले. एवढेच नाही तर, ते बेट महासागरातील असल्यामुळे, महासागरातील पाणी प्रदूषित झाले आणि पृथ्वीवरील सर्व महासागरांशी ते जोडलेले असल्याकारणाने पृथ्वीच्या वातावरणात सर्व दूर हे प्रदूषण फैलावले.

भारतानेही १९७४ साली चाचणीकरता अणुस्फोट केला. तो अणुस्फोट मात्र भूमीच्या अंतर्गत खोलवर केला. त्यामुळे जेव्हा स्फोट झाला तेव्हा ताबडतोब आसपासची जमीन वितळली. त्याचा ज्वालामुखीसारखा लाव्हा रस तयार झाला आणि त्या लाव्हा रसालासुद्धा वितळल्यानंतर निवण्याकरता वेळच न मिळाल्या कारणाने त्याचे काचेत रूपांतर झाले. हे होत असताना सारा किरणोत्सार हा जमिनीमध्ये जिवंत गाडला गेला आणि त्याचा उपसर्ग

[1] एन्रिको फर्मी: अणुयुगाचा प्रणेता, मूळ इंग्रजी लेखक: टेड गॉटफ्रीड, प्रकाशक: युनिव्हर्सिटी प्रेस, प्रकाशन काल: १९९९, मालिका: आधुनिक युगाचे कर्ते, वितरक: ओरिएंट लाँगमन लिमिटेड, किंमत: रु.१२५/- फक्त.

कोणत्याही प्रकारे पर्यावरणाला झाला नाही. भारताने मग १९९८ सालीही चाचणीकरता अणुस्फोट केले. या अणुस्फोटानंतर, जगभर अशी मान्यता उदयास आली की, चाचणी अणुस्फोट भूमीच्या अंतर्गत खोलात करावेत, म्हणजे किरणोत्साराचा प्रसार होणार नाही. त्यामुळे चाचणीकरता भूमीच्या अंतर्गत स्फोट, हे धोरण जगाने भारताच्या अनुभवावरून स्वीकारले.

'अणुविवेक' नावाच्या राजहंस प्रकाशनाने १९९५ साली प्रकाशित केलेल्या एका पुस्तकात[२], लेखक दिलीप कुलकर्णी म्हणतात, अण्वस्त्रे ही विनाशकारी, प्रलयंकारी आहेत हे आपण जाणतो. पण अण्वस्त्रांच्या चाचण्याही तितक्याच घातक आहेत हे आपल्याला ठाऊकच नसते. अणुवीज ही स्वच्छ, स्वस्त आणि सुरक्षित आहे या भूलथापेवर आपण भाबडेपणाने विश्वास ठेवतो! हे विधान वस्तुस्थितीवर आधारित नाही. वस्तुतः भारताकरता अणुऊर्जेचा इतिहास अत्यंत आश्वासक राहिलेला आहे. भारतातल्या शास्त्रज्ञांनी ''अणुवीज ही स्वच्छ, स्वस्त आणि सुरक्षित आहे'' हे वेळोवारी सप्रमाण सिद्धही केलेले आहे. भाभा अणुसंशोधन केंद्रात कसे काम चालते आणि देशातले बिनीचे शास्त्रज्ञ अपार कष्ट करून देशास जगात सर्वांपुढे कसे ठेवतात हे, मनोविकास प्रकाशनाच्या एका नव्याच पुस्तकात[३] तपशीलाने लिहिले आहे.

''भारतीय वैज्ञानिक संस्थांमधील एक अव्वल यशस्वी संस्था असलेल्या भाभा अणुसंशोधन केंद्राच्या आत नेमके काय चालते याची उत्सुकता सर्वांच्या मनात असते. त्याचे कथन या यशाचे साक्षीदार असलेले आल्हाद आपटे उत्कृष्टतेबरोबरच अधिकारवाणीने करू शकतात. अणुकार्यक्रमाचा इतिहास सुस्पष्टपणे, संबंधित मानवी कंगोरे, निगडित परिस्थितीचा संदर्भ, आनुषंगिक मनोरंजक व चित्तवेधक गोष्टी यांनी सजवून रंजकपणे प्रस्तुत केला आहे. भाभा अणुसंशोधन केंद्राचे दार किलकिले करून आतील वैज्ञानिक विश्वाचे दर्शन घडवणारा मराठीतील पहिलाच ग्रंथ.'' असे त्याचे वर्णन त्यात सांगितलेले आहे. या पुस्तकास डॉ. अनिल काकोडकर ह्यांची प्रस्तावनाही लाभलेली आहे.

भारताच्या भूमीअंतर्गत चाचणी अणुस्फोटांमध्ये किरणोत्साराचे प्रदूषण झाले नाही. मनुष्यहानी झाली नाही. चिटपाखराचेही त्यात नुकसान झाले असा अहवाल नाही. भारतातील अणुऊर्जेचा इतिहास किरणोत्सारावरील विजयाचाच इतिहास आहे. हा विजय अभूतपूर्व आहे. याचा आपल्याला अभिमान वाटला पाहिजे.

त्यापूर्वी आधुनिक जगास अणुऊर्जेची ओळखच झालेली नव्हती. अणुच्या अंतरंगात अपार ऊर्जा दडलेली असते, ती मुक्त करता येते असा शोधच मुळी या घटनेने लागला होता. अणुतील संहारक ऊर्जेचे तर प्रात्यक्षिकच झालेले होते. पुढील दहा वर्षांत अणुऊर्जेच्या नियंत्रित विमोचनाचे मार्गही शोधले गेले. भारत हा अणुऊर्जेच्या दोहनार्थ सर्वाधिक चपळाईने सिद्ध झाला. डॉ. होमी भाभांच्या पुढाकाराने अणुऊर्जा आयोगाचा[४] जन्म १९४८ मध्येच झाला. ३ ऑगस्ट १९५४ रोजी भारतीय अणुऊर्जा विभागाची स्थापना झाली. अणुऊर्जा आयोगाने निर्धारित केलेल्या धोरणांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी या खात्यावर सोपवण्यात आली. संसदेने मंजूर केलेल्या अंदाजपत्रकी मर्यादांतर्गतचे भारत सरकारचे सर्व प्रशासकीय आणि आर्थिक अधिकार या विभागाला

[२] अणुविवेक, दिलीप कुलकर्णी, राजहंस प्रकाशन, १९९५, रु.८०/-, पृष्ठेः १४३

[३] भारताची अणुगाथा, आल्हाद आपटे, मनोविकास प्रकाशन, २०१७, रु.४३०/-, पृष्ठेः ३५९.

[४] अणुऊर्जा आयोग http://www.aec.gov.in/

प्रदान करण्यात आले. डॉ. होर्मसजी जहांगीर भाभा, भारतीय अणुऊर्जा आयोगाचे पहिले अध्यक्ष झाले. २४ जानेवारी १९६६ रोजी माऊंट ब्लांकवरील दुर्दैवी विमान अपघातात त्यांचा मृत्यू होईपर्यंत त्यांनी ही जबाबदारी सांभाळली. त्यांना 'भारतीय अणुऊर्जा संशोधनाचे जनक' मानले जाते. त्यांच्या दूरदृष्टीतूनच भारतीय अणुऊर्जा कार्यक्रमाचा उदय झाला.

विश्वकिरणांच्या वर्षावांवर त्यांनी मोलाचे संशोधन केले होते. ते ब्रिटनमध्ये राहूही शकले असते. तिथे त्यांना सन्मानही मिळाला असता. मात्र, पुरेसा सन्मान आणि आर्थिक पाठबळ मिळत असेल तर देशातच राहून, इतर सुदैवी देशांत असलेल्या शैक्षणिक संस्थांच्या तुल्यबळ संस्था, आपल्या देशातच उभ्या करणे हे आपले कर्तव्य आहे असे त्यांचे मत होते[५]. टाटा मूलभूत विज्ञान संस्था, ऍटॉमिक एनर्जी एस्टॅब्लिशमेंट ट्रॉम्बे (ए.ई.ई.टी., भाभांच्या अपघाती मृत्यूनंतर याच संस्थेचे नामकरण 'भाभा अणुसंशोधन केंद्र' असे करण्यात आले) आणि त्याची प्रशिक्षण शाळा, या भारताच्या संशोधनक्षेत्रावर चिरकाल राहणारा ठसा उमटविणाऱ्या संस्था त्यांनीच स्थापन केल्या. अशा देशप्रेमी विज्ञान नेतृत्वाचा आपल्याला अभिमान वाटला पाहिजे.

होमी नसरवानजी सेठना[६] ह्यांनी भारतीय अणुऊर्जा आयोगाची जबाबदारी सांभाळली. १९७२ ते १९८३ अशी एकूण ११ वर्षे ते अणुऊर्जा आयोगाचे अध्यक्ष राहिले. भारतातील पहिली अणुभट्टी 'सायरस' नावाची ४०० लक्षवॉट औष्णिक क्षमतेची अणुभट्टी होती. १९५६ ते १९५८ दरम्यान 'सायरस'च्या उभारणी प्रकल्पाचे ते व्यवस्थापक होते. भारतातील पहिल्या प्ल्युटोनियम कारखान्याचे अभिकल्पन आणि उभारणीही त्यांच्याच नेतृत्वाखाली करण्यात आली. १९६४ सालीच त्यांनी प्ल्युटोनियम तयार केलेले होते. प्ल्युटोनियम या किरणोत्सारी जड धातूचा उपयोग अणुस्फोटके तयार करण्यासाठी होत असतो. अणुऊर्जेपासून विद्युतऊर्जा निर्माण करण्यासाठीही त्याचा उपयोग होऊ शकतो. तशी विद्युतऊर्जा निर्मितीची संयंत्रे तयार करावी लागतात. भारताने तर अणुऊर्जा दोहनार्थ एक संपूर्ण कार्यक्रमच तयार केला होता. या साऱ्याचा आपल्याला अभिमान वाटला पाहिजे.

मात्र जेव्हा अणुसंयंत्र चालवली जातात तेव्हा त्याचा अणुस्फोटाशी काहीही संबंध नसतो. अणुस्फोटासारखे किरणोत्सार त्यात निर्माणच होत नाहीत. संयंत्र चालवण्यामधून जो किरणोत्सार होतो त्याचे प्रमाण अत्यंत नगण्य असते आणि त्याचा मनुष्यजातीला कुठलाही अपाय होत नाही. संयंत्रात किरणोत्साराचा प्रसार होऊ शकत नाही आणि अणुस्फोटासारखा संयंत्राचा स्फोट तर कधीही होऊच शकत नाही, कारण दोन्हींच्या संकल्पनांची उद्दिष्टे मुळातच निरनिराळी असतात.

२८ ऑक्टोबर १९६९ रोजी भारताने अणुऊर्जा दोहनार्थचे पहिले संयंत्र तारापूर येथे स्थापन केले होते[७]. त्यात प्रत्येकी १६ कोटीवॉट विद्युतनिर्मिती क्षमतेच्या दोन अणुभट्ट्या उभारण्यात आलेल्या होत्या. आजमितीस भारताची अणुऊर्जेपासून विद्युतनिर्मितीची स्थापित क्षमता ८.१८ अब्जवॉटस इतकी आहे. या दरम्यान वाढत्या प्रमाणात ऊर्जानिर्मिती करत असताना गेल्या ५५ वर्षांच्या इतिहासात एकही उल्लेखनीय दुर्घटना या प्रकल्पांत झालेली नाही आणि उल्लेखनीय किरणोत्सार

[५] होर्मसजी जहांगीर भाभा https://anuvad-ranjan.blogspot.com/2012/04/blog-post_13.html

[६] के.एस.पार्थसारथी ह्यांचा 'करंट सायन्स' जर्नलमधील होमी नसरवानजी सेठना ह्यांचेवरील लेख https://www.currentscience.ac.in/Volumes/100/08/1245.pdf

[७] https://www.npcil.nic.in/content/253_1_ OperatingPerformance.aspx

तर नाहीच नाही. अणुऊर्जा दोहनाचा आपला इतिहास पूर्णनियंत्रित, सुरक्षित ऊर्जा विमोचनाचा राहिलेला आहे. स्थापित क्षमतेच्या पूर्ण क्षमतेने संयंत्र वापराचे प्रमाण आपल्याकरता गौरवास्पद राहिलेले आहे. संपूर्ण संयंत्र इंधनभरणार्थ वा देखरेखीकरताही न थांबता सलग एक वर्षाहून अधिक काळपर्यंत चालवत ठेवण्याचा विक्रमही आपण अनेकदा केलेला आहे. कैगा जनरेटिंग स्टेशन युनिट-१, आपण १३ मे २०१६ पासून तर ३१ डिसेंबर २०१८ पर्यंत सलग चालवलेले आहे. हा ९६२ दिवसांचा आपण रचलेला एक जागतिक विक्रम आहे[८]. त्याचाही आपल्याला अभिमान वाटला पाहिजे.

असे लक्षात आलेले आहे की, वातावरणातील अतितरल धूलिकणांचा प्रमुख स्रोत कोळशावर चालणारे विद्युतप्रकल्प असतात[९]. देशात एकूण विजनिर्मिती ही सुमारे ४४२ अब्जवॉटस इतकी आहे. त्यातील सुमारे ५०% वीज ही कोळसा वा तत्सम इंधनांपासून तयार केली जात असते. त्यामुळे उद्भवणारे अतितरल धूलिकण, मानवी मृत्यूंचा दर वाढवत असतात. त्यातील गंधकप्राणिल (सल्फर डाय ऑक्साईड), काजळी (ब्लॅक कार्बन) आणि धात्विक धूळ पर्यावरणाचा ऱ्हास घडवत असते. असा ऱ्हास अणुसंयंत्रामध्ये होतच नाही. अणुसंयंत्रामध्ये कोळशाच्या संयंत्रांप्रमाणे कर्बप्रदूषण होत नाही. त्यांत होणारे कर्बप्रदूषण अत्यंत नगण्य असते. त्यामुळे पर्यावरण पूरक असा आपल्याला जर प्रकल्प निवडायचा असेल तर, कोळशाच्या संयंत्राच्या तुलनेत अणुसंयंत्र हे पसंत करायला हवे.

कोळशापासून विद्युत निर्मिती करण्याच्या प्रकल्पामध्ये वातावरणातील वायू कर्बप्रदूषित तर होत असतोच, पण त्यासोबतच राख सुद्धा उत्पन्न होत असते. एकूण राखेच्या निष्पन्नापैकी २०% राख खाली उरते. मात्र ८०% राख उडून वातावरणास प्रदूषित करत असते. कोळशाच्या विद्युत निर्मितीमुळे वातावरणामध्ये राखेचे ढिगारेच्या ढिगारे निर्माण होतात. त्या राखेचं काय करायचं हे कोणालाही समजत नाही. अत्यंत हलकी आणि सहज उडून जाणारी तरल स्वरूपाची राख तर पर्यावरण खराब करत असतेच; शिवाय त्या राखेच्या पसरण्यामुळे जमिनी नापीक होत असतात. भारतीय वनखात्याच्या १४ सप्टेंबरच्या परिपत्रकात, विविक्षित कालावधीत, खाली उरलेली १००% राख निरनिराळ्या उपयोगांत वापरली जावी असे म्हटले आहे[१०]. मात्र हे केवळ ५०% च साधले जाऊ शकले आहे. अशा मोठ्या प्रमाणातील प्रदूषणाच्या समस्या अणुऊर्जाप्रकल्पांत असतच नाहीत.

भारतातील जलविद्युत प्रकल्पांची अनुमानित क्षमता सुमारे १४८ अब्जवॉटस इतकी आहे[११]. सुमारे ८४ अब्जवॉटस इतकी विजेची मागणी ती भागवू शकते. मात्र सध्या भारतात यातील केवळ २०% क्षमताच वापरली गेलेली आहे. २००८ साली पूर्ण झालेल्या तिस्ता जलविद्युत प्रकल्पातील वीज एका एककास रु.१.५३/- एवढ्या कमी दराने उपलब्ध होत असते. विजेच्या शिखर मागणीस भागविण्याकरता जलविद्युत प्रकल्पच प्राधान्याने वापरले जात असतात, कारण ते सत्त्वर सुरू वा बंद करता येतात. मात्र जलविद्युत प्रकल्पाच्या दर दशलक्षवॉट स्थापित क्षमतेपाठी सुमारे ०.७६ हेक्टर जमीन, पाणलोटक्षेत्राखाली बुडून जात असते. जलविद्युत प्रकल्पामध्ये पाणलोट क्षेत्राच्या

---

८ https://www.npcil.nic.in/WriteReadData/userfiles/file/Major_Achievements_Report_ English_17012019_01.pdf

९ https://www.nih.gov/news-events/nih-research-matters/deaths-associated-pollution-coal-power-plants

१० https://cag.gov.in/uploads/journal/august-2015/issues-in-utilization-of-ash-by-thermal-power-plants-in-the-country.html

११ https://wrd.maharashtra.gov.in/Site/Upload/PDF/faqhp.pdf

जमिनीवरती पाणी भरल्याकारणाने पर्यावरणाचा खूप ऱ्हास होतो. ती भूमीही पाण्याखाली जाते आणि तिचा वापर मनुष्याकरता होऊ शकत नाही. अशा प्रकारची कुठलीच समस्या अणुसंयंत्राच्या संदर्भात उपस्थित होत नाही. अणुविद्युत प्रकल्पांची जमिनीची गरज यामानाने नगण्यच असते.

गेल्या तिमाहीत भारतातील सौर विद्युत उत्पादन एकूण विजनिर्मितीच्या सुमारे २०% पर्यंत वाढले आहे[१२]. देशातील सुमारे ४३% वीज आज पुनर्नविनीक्षम स्रोतांपासून तयार होत आहे. ती सुमारे १९० अब्जवॉटस इतकी आहे. देशात एकूण विजनिर्मिती ही सुमारे ४४२ अब्जवॉटस इतकी आहे. यात अणुऊर्जा केवळ ८ अब्जवॉटस इतकी नगण्य आहे. अणुऊर्जा स्वच्छ आहे, सुरक्षित आहे, तुल्यखर्चिक आहे आणि तिच्यातील आपला अनुभवही आजवर गौरवास्पद राहिलेला आहे. त्यामुळे आपल्याला अणुऊर्जेचा विकास करून आपल्या विकासास गती देण्याची आवश्यकता आहे.



या प्रकाशचित्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी इंधनभरणास सुरुवात करताना दिसत आहेत. सोबतच (उजवीकडून डावीकडे) अणुऊर्जा आयोगाचे विद्यमान अध्यक्ष डॉ. अजितकुमार मोहंती, भारताचे सुरक्षा सल्लागार अजित डोभाल, भाभा अणुसंशोधन केंद्राचे संचालक श्री. विवेक भसीन आणि भाविनीचे अध्यक्ष श्री. के. व्ही. सुरेशकुमार हेही दिसत आहेत.

४ मार्च २०२४ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी, भारताच्या तीन टप्प्यांच्या अणुकार्यक्रमातील, दुसऱ्या टप्प्यातील ऐतिहासिक प्रवेश, कळपक्कम येथील ५० कोटीवॉट विद्युत क्षमतेच्या, ''प्रारूप शीघ्र प्रजनक[१३] अणुभट्टी''च्या गर्भातील इंधनभरण्यास सुरुवात होताना स्वतः प्रत्यक्ष उपस्थित राहून अनुभवला. या प्रकारची ही पहिलीच अणुभट्टी असल्याने तिला 'प्रारूप' म्हणजे 'पथदर्शी' असे म्हटलेले आहे. शीघ्रगती विरक्तकांवर (फास्ट न्यूट्रॉन्स वर) ती चालत असल्याने तिला 'शीघ्र' म्हणतात. मात्र ती जेवढे इंधन खर्च करते, त्याहून जास्त इंधनाची निर्मितीही ती त्याच वेळी करत असते, त्यामुळे तिला 'प्रजनक' अणुभट्टी असे म्हटले जाते. या अर्थाने ती पुनर्नविनीकरणक्षम आहे असेही म्हणता येईल.

इंधनभरणा पूर्ण होताच अणुभट्टीची क्रांतिकतेकडे पहिली वाटचालही सुरू होईल. मग यथावकाश विद्युतनिर्मितीही सुरू होईल. 'आत्मनिर्भर भारत' धोरणानुसार ही अणुभट्टी, भारतीय अणु-विद्युत निगम मर्यादित (भाविनी- BHAVINI-Bharatiya Nabhikiya Vidyuta Nigam) ही नोंदीत पेढी निर्माण करत आहे. पूर्णतः स्वदेशी बनावटीची संकल्पना करून, तशीच ती घडवलेली आहे. भारतातील २०० हून अधिक मध्यम व लहान उद्योगांचाही या कार्यात सहभाग राहिलेला आहे. भारताचा अणुकार्यक्रम अशा उद्देशाने तयार केलेला आहे की, दीर्घकालीन ऊर्जा सुरक्षा साध्य व्हावी आणि त्याचवेळी शाश्वत विकासही व्हावा.

भारताने संपूर्ण अणुइंधन चक्रावरील सर्वंकश सामर्थ्ये प्राप्त करून घेतलेली आहेत. सरकारने २००३ साली 'भाविनी'स भारताची सर्वांत प्रगत अशी प्रारूप शीघ्र प्रजनक अणुभट्टी उभारण्यास, तसेच चालवण्यास संमती

[१२] https://www.mercomindia.com/solar-share-power-mix-q1-24

[१३] PFBR BH-VINI Brochure-6 Pages-Released June 2018 https://bhavini.nic.in/

दिली. ही कार्यान्वित होईल तेव्हा, रशियानंतर भारत हा दुसरा असा देश ठरेल, ज्याने शीघ्र प्रजनक अणुभट्टी व्यापारी स्तरावर सुरू केलेली आहे.

आपल्या देशात युरेनियम साठे मर्यादित आहेत आणि थोरियम साठे विपुल प्रमाणात उपलब्ध आहेत. त्यांच्यापासून दीर्घकालीन ऊर्जासुरक्षा प्राप्त करणे गरजेचे आहे. भारताने त्यासाठी तीन टप्प्यांचा अणुकार्यक्रम अवलंबलेला आहे. त्याचा उद्देश देशातील आण्विक स्रोतांचा इष्टतम वापर करण्याचा आहे. हा कार्यक्रम क्रमवार आहे. प्रत्येक टप्प्याकरता इंधनक्रम योजलेले आहेत. वापरलेल्या इंधनाचे पुनर्प्रक्रियण करून पुढील टप्प्यातील इंधन मिळवता येत असते. हे तीन टप्पे पुढीलप्रमाणे आहेत.

१. नैसर्गिक युरेनियम इंधनावर चालणाऱ्या, दाबित जड पाणी अणुभट्ट्या,

२. प्ल्युटोनियम इंधनावर चालणाऱ्या, शीघ्र प्रजनक अणुभट्ट्या आणि

३. थोरियम–युरेनियम चक्रात, युरेनियम–२३३ इंधनावर चालणाऱ्या, प्रगत अणुभट्ट्या.

पहिल्या टप्प्यातील दाबित जड पाणी अणुभट्ट्यांचा कार्यक्रम, भारतीय अणुऊर्जा महामंडळ मर्यादित (एन.पी.सी.आय.एल. ANPCIL - Nuclear Power Corporation of India Limited) ही नोंदीत पेढी चालवत आहे. दुसऱ्या टप्प्यातील शीघ्र प्रजनक अणुभट्ट्यांचा कार्यक्रम 'भाविनी' पुढे नेत आहे.

भाविनी ही भारत सरकारच्या अणुऊर्जा विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणातील नोंदीत पेढी आहे. तिचा उद्देश तमिळनाडूतील कळपक्कम येथे, पहिली ५० कोटीवॉट विद्युत क्षमतेची शीघ्र प्रजनक अणुभट्टी उभारणे आणि तिचे कार्यान्वयन करण्याचे आहे. त्यानंतर देशाला दीर्घकालीन ऊर्जासुरक्षा पुरवण्याकरता भारत सरकारच्या अणुऊर्जा कार्यक्रमाखाली, विद्युत निर्मितीकरता भावी प्रजनक अणुभट्ट्यांची उभारणी, कार्यान्वयन, संचालन व देखभाल यांची जबाबदारीही भाविनीस दिलेली आहे.

शीघ्र प्रजनक अणुभट्टी प्रकाराची ही सुरुवात आहे. भावी काळात ६० कोटीवॉट क्षमतेच्या आणखी २ शीघ्र प्रजनक अणुभट्ट्या, प्रारूप अणुभट्टीलगतच कळपक्कम येथे उभारल्या जाणार आहेत. त्या, देशास दीर्घकालीन ऊर्जा सुरक्षा पुरवतील अशी अपेक्षा आहे. कळपक्कम येथील इंदिरा गांधी अणुऊर्जा संशोधनकेंद्रात (सेंटर फॉर ॲटॉमिक रिसर्च) विकसित केलेल्या अभिकल्पन आणि तंत्रज्ञानाचे आधारे ही प्रारूप अणुभट्टी उभारली जात आहे.

सुरुवातीस प्रारूप शीघ्र प्रजनक अणुभट्टीत युरेनियम प्राणील व प्ल्युटोनियम प्राणील यांचे मिश्रण इंधन म्हणून वापरले जाईल[14]. इंधनाभोवतीचे आच्छादन इंधनाच्या पुनर्निर्मितीकरता वापरले जाते. या भागास 'पांघरूण' (ब्लँकेट) म्हणतात. इंधनातून बाहेर पडणारे शीघ्र विरक्तक (न्यूट्रॉन्स) यात शोषले जाऊन यातील धातूचे रूपांतर विदलनक्षम धातूत होते. पुनर्प्रक्रियणानंतर हा विदलनक्षम धातू मग इंधन म्हणून वापरता येतो. वापरल्या जाणाऱ्या इंधनाहून नव्याने निर्माण होणारे इंधन जास्त असते, म्हणूनच अशा प्रकारच्या अणुभट्टीस 'प्रजनक अणुभट्टी' म्हटले जात असते. युरेनियम–२३८ चा उपयोग 'पांघरूण' म्हणून केला जाईल. थोरियम–

[13] भारतसरकारचे प्रसिद्धीपत्रक https://pib.gov.in/PressReleaseIframePage.aspx?PRID= 2011347.

माणसाला दोनच गोष्टी हुशार बनवतात; एक म्हणजे, – 'वाचलेली पुस्तकं' आणि दुसरी, – 'भेटलेली माणसं!'

२३२ विदलनक्षम नाही. मात्र पांघरूण म्हणून वापरल्यास त्याचे अंशतः युरेनियम-२३३ या विदलनक्षम धातूत रूपांतरण होत असते. म्हणूनच या टप्प्यात थोरियम-२३२ चा उपयोगही पांघरूण म्हणून केला जावयाचा आहे. रुपांतरणात तयार होणाऱ्या युरेनियम-२३३ चा उपयोग तिसऱ्या टप्प्यातील अणुभट्ट्यांत इंधन म्हणून केला जाणार आहे. जगात थोरियमचा साठा आपल्याच भूमीत सर्वाधिक आहे. तिसरा टप्पाही कार्यान्वित झाल्यावर, भारतातील थोरियम साठ्याचा पूर्णांशाने वापर होऊ लागून, आपल्या दीर्घकालीन ऊर्जा सुरक्षेकरता, आपण त्याचा उपयोग करून घेऊ शकू, कारण अशा प्रकारे वापरल्यास स्वदेशी थोरियम देशाला २५० वर्षांहूनही अधिक काळपर्यंत वीज पुरवू शकेल असे अनुमान आहे.

सौरऊर्जा आणि पवनऊर्जा हे पुनर्नविनीकरणक्षम स्रोत वगळता, मनुष्यनिर्मित सर्व विद्युत प्रकल्पांमध्ये अणुविद्युत प्रकल्प हे सर्वाधिक दीर्घकालीन ऊर्जापुरवठा करण्यास सक्षम आहेत. त्यांच्याहून इतर कोणताही प्रकार हा अधिक काळ ऊर्जा पुरवू शकत नाही. मात्र कोळशाची व इतर खनिज तेलांवर आधारित विद्युत यांहून अणुऊर्जा प्रकल्प खूप दीर्घकाळ ऊर्जापुरवठा करू शकतात.

अणुऊर्जा प्रकल्पांत निर्माण होणाऱ्या, वापरलेल्या आण्विक इंधनातील सक्रिय किरणोत्सारी अवशिष्ट पदार्थांतील किरणोत्सार निराळा करून, संघनित करून, काचेत बंद करण्याचा आणि जमिनीत पुरून टाकण्याच्या तंत्राचाही आपण भारतात विकास केलेला आहे. त्यामुळे संपूर्ण अणुइंधनचक्राबाबत आपण स्वावलंबी झालो आहोत. एवढेच नव्हे तर, त्यामुळे होऊ शकणारे संभाव्य किरणोत्सार प्रदूषणही आपण नामशेष केलेले आहे. असे करू शकणाऱ्या मोजक्या देशांत आपणही आलो आहोत. याचा आपल्याला अभिमान वाटला पाहिजे.

ऊर्जेविना विकास होऊ शकत नाही. सर्वसामान्य इंधनांवर चालणारी संयंत्रे आपल्याला सुमारे ५०% ऊर्जा पुरवतात खरी, मात्र प्रदूषणाची किंमत मोजून. प्रदूषणाविना ते साध्य करायचे तर अणुऊर्जा हवीच. त्याशिवाय दीर्घकालीन ऊर्जा सुनिश्चित करायची तरीही अणुऊर्जा हवीच.

त्यामुळे उपलब्ध ऊर्जांचा विचार करता भारतात आजतरी अणुऊर्जा ही एक आशादायक संभावना बनून राहिलेली आहे. सौर आणि पवन ऊर्जांव्यतिरिक्त आपल्या गरजा भागवण्याकरताची अपार क्षमता अणुऊर्जेत आहे. ती पर्यावरण स्नेही आहे, पर्यावरणपूरक आहे आणि आपले तिच्या तंत्रावर संपूर्ण नियंत्रणही प्रस्थापित झालेले आहे. तिच्या बाबतीत आपण पूर्णतः स्वावलंबी झालेलो आहोत. दीर्घकालीन ऊर्जासुरक्षेचा विचार तर अणुऊर्जेविना केलाच जाऊ शकत नाही. अशा परिस्थितीत आपले धोरण सौर ऊर्जेस सर्वात अनुकूल आहे. २०४० सालपर्यंत आपली एकूण ऊर्जेच्या ४०% वीज सौर असणार आहे. तरीही, अणुऊर्जेचे दोहन करून आपण दीर्घकालीन ऊर्जासुरक्षा सुनिश्चित करावी हेच शहाणपणाचे ठरेल. जागतिक तापमानवाढीस रोखणारे ठरेल. तसे करण्यास आज आपण पात्र आहोत, याचाही आपल्याला अभिमान वाटला पाहिजे.

**– श्री नरेंद्र गोळे**
१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) – ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

•••


*दिशा संपर्क दूरध्वनी*
**०२२-२५४२ ६२७०**

# फ्रान्समधील सद्यस्थिती व फ्रेंच राज्यक्रांती पुस्तक

*ज्येष्ठ लेखक जयंत कुलकर्णी यांनी लिहिलेल्या फ्रेंच राज्यक्रांती या पुस्तकाच्या परिपक्षात सद्यस्थितीत फ्रान्समधील घटनांचा घेतलेला आढावा प्रस्तुत लेखात घेतला आहे - संपादक*

आज फ्रान्समध्ये काय चालले आहे ते आपण रोज पहातोय, वाचतोय, पण फ्रान्सच्या लोकांची मानसिकता काय आहे, कशी आहे हे समजण्यासाठी मी सुचवेन की, माझे 'फ्रेंच राज्यक्रांती' हे पुस्तक वाचकांनी जरूर वाचावे. यात डावे जे राजकारण पूर्वीपासून करत आलेले आहेत त्याचा उलगडा होऊ शकेल.

फ्रेंच राज्यक्रांती बद्दल जे साहित्य लिहिले गेले आहे किंवा उपलब्ध आहे त्या साहित्याचा प्रवास टप्प्याटप्प्याने झाला आहे असे म्हणायला हरकत नाही. सुरुवातीच्या लेखकांनी त्यांच्या लिखाणाला आणि निष्कर्षासाठी आधार घेतला तो, लिहून ठेवलेल्या आठवणी, पत्रके (त्या काळात या पत्रकांमध्ये जनमत हलवण्याची ताकद होती), वर्तमानपत्रे, ऐकीव कहाण्या आणि सामाजिक आणि राजकीय पूर्वग्रह असलेली मते; त्यानंतरच्या लेखकांनी मात्र संदर्भ गोळा केले आणि इतिहास लिहिला. उदा.पॅरिस कम्युनची दप्तरांचा त्यांनी अभ्यास केला आणि सत्यावर आधारलेला इतिहास लिहिण्याचा प्रयत्न केला जो आजच्या इतिहासकारांनाही उपयुक्त आहे. फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळेस आणि नंतर जी मते मांडण्यात आली ती इतिहासाच्या मुशीत नष्ट झाली असे ॲक्टन सारखे इतिहासकार म्हणतात ते काही खोटे नाही. कारण जी मते मांडण्यात आली जे काही निष्कर्ष काढण्यात आले त्याची आजही पुनर्मांडणी चालू आहे. त्या काळातील विध्वंस आणि उभारणी आजच्या काळातही सुरू आहे. त्या काळात मांडलेले तत्त्वज्ञान आजही वेगवेगळ्या स्वरूपात तग धरून आहे आणि राजकारणी, अर्थतज्ज्ञ, आदर्शवादी मंडळींना जेरीस आणते. किंबहुना आजच्या आधुनिक जगातील जटील प्रश्न, अडचणी आणि संकटे यांची पूर्वसूचना फ्रेंच राज्यक्रांतीने दिली होती असे मानण्यास जागा आहे. अर्थात इतिहास जसाच्या तसाच परत घडतो असे नाही. त्यात थोडाफार फरक पडतोच. त्यामुळे सध्या जे घडते आहे त्याचा इशारा फ्रेंच राज्यक्रांतीत कसा मिळतो यासाठी वाचकांना जरा अभ्यास करावा लागेल. एका इतिहासकाराने म्हटल्याप्रमाणे, 'आपल्याला फ्रेंच राज्यक्रांती समजणार नाही जोपर्यंत ही क्रांती सामान्य कायद्याला धरून होती आणि सामान्यांनी घडवून आणली होती हे आपण समजून घेत नाही. या क्रांतीत भव्य दिव्य काही नव्हते, ना ती एकमेवाद्वितीय होती.' (अर्थात हे खोटे आहे. यामागे समाजवादी व अराजकवादी मंडळींचा हात होता हे आता सिद्ध झाले आहे). त्यामुळे काही लेखक





(पृष्ठ क्र.२२ वर)

# गुन्हेगारी साहित्यविश्वाचा विक्रमादित्य सम्राट : मायकल कॉनली

*सातत्याने गुन्हेविश्वातल्या अनोख्या प्रवासाला नेणाऱ्या, त्यांचं वाचनविश्व समृद्ध करणाऱ्या अशा या मायकल कॉनलीचा आज (२१ जुलै) वाढदिवस. आज कॉनली वयाची ६८ वर्षं पूर्ण करतोय. आयुष्याच्या अर्ध्याहून अधिक काळ दर्जेदार लिखाण करून, वाचकांना मोहून टाकणाऱ्या या किमयागार क्राईम-फिक्शन लेखकाच्या लेखनावर प्रकाश टाकणारा हेरंब ओक यांचा लेख - संपादक*

२०११ मध्ये 'द लिंकन लॉयर' नावाचा एक चित्रपट प्रदर्शित झाला. चित्रपट बघायचा ठरवत असतानाच चित्रपट ज्या पुस्तकावर आधारित आहे ते पुस्तक अतिशय उत्तम आहे असं कळल्याने आधी पुस्तक वाचायचं ठरवलं. पण काही कारणाने पुस्तकही वाचायचं राहून गेलं आणि अर्थातच त्यामुळे चित्रपटही बघायचा राहून गेला. तोपर्यंत इतरांचे चित्रपट दाखवणाऱ्या ॲमेझॉन प्राईमवाल्यांनी, २०१५ च्या जानेवारी महिन्यात सर्वप्रथम त्यांची स्वतःची निर्मिती असलेली अर्थात ॲमेझॉन प्राईम ओरिजनल असलेली 'बॉश' ही सिरीज प्राईमच्या सदस्यांना उपलब्ध करून दिली. पहिला हंगाम (सिझन) ठीकठाक होता. फार काही विशेष वाटला नाही. त्यावेळी असं वाचनात आलं की, मूळ पुस्तक हे मालिकेपेक्षा खूपच उत्तम आहे. शोधाशोध करत असताना बॉश ही व्यक्तिरेखा केंद्रस्थानी ठेवून लिहिलेली ही पुस्तकांची मोठी मालिकाच आहे हे लक्षात आलं. पहिलं पुस्तक होतं १९९२ साली प्रकाशित झालेलं 'द ब्लॅक एको' आणि लेखक होता मायकल कॉनली. नाव ओळखीचं वाटत होतं आणि त्याचं कारणही काही काळाने लक्षात आलं. नंतर वाचू म्हणून बाजूला ठेवून दिलेल्या लिंकन लॉयरचा लेखकही मायकल कॉनलीच होता. अर्थात मायकल कॉनलीची पुस्तकं मी अनेकदा वाचनालयात बघितली होती. पण कधी वाचनाचा योग आला नव्हता. अखेरीस लिंकन लॉयर वाचायला घेतलं आणि अक्षरशः हादरूनच गेलो.




**मायकल कॉनली :**

मायकल जोसफ कॉनली १९८० मध्ये औपचारिक शिक्षण पूर्ण करून काही वर्षं छोट्या मोठ्या वृत्तपत्रांत काम करत १९८७-८८ च्या सुमारास लॉस अँजलस टाईम्समध्ये गुन्हेविषयक वार्ताहर म्हणून रुजू झाला. तिथे ३-४ वर्षं काम केल्यानंतर त्याने 'द ब्लॅक एको' या पुस्तकाद्वारे कालांतराने अतीव लोकप्रिय होणार असणाऱ्या आपल्या 'डिटेक्टिव्ह हॅरी बॉश' या पात्राला जन्माला घातलं. बॉश या व्यक्तिरेखेचं पहिलंच पुस्तक प्रचंड गाजलं. बॉशला वाचकांनी अक्षरशः डोक्यावर घेतलं. कालांतराने नोकरीला रामराम ठोकून कॉनलीने पूर्ण वेळ लेखन करायला सुरुवात केली. त्याच्या गुन्हेविषयक पत्रकारितेचा त्याला पुस्तकं लिहिण्यासाठी, तसेच

नात्याची सुंदरता एकमेकांचे दोष स्वीकारण्यात आहे; कारण एकही दोष नसलेल्या माणसाचा शोध घेत बसलात तर आयुष्यभर एकटे राहाल!

कादंबऱ्यांमधील पात्रं अस्सलपणे रंगवण्यासाठी खूप उपयोग झाला.

**कादंबऱ्यांचं स्वरूप :**

कॉनलीच्या कादंबऱ्या प्रामुख्याने गुन्हेविषयक थरार मांडणाऱ्या आणि छोटेमोठे धक्के देत अखेरीस रहस्यांचा उलगडा करणाऱ्या असतात. त्याच्या कादंबऱ्यांमधला कथापट चांगलाच गुंतागुंतीचा असतो, मल्टीलेयर्ड असतो. प्रमुख पात्राच्या बरोबरीने इतरही अनेक दुय्यम पात्रांचा कथेत नियमित राबता असतो. प्रमुख पात्र हे कादंबरीतील मुख्य प्रकरणाच्या (केस) बरोबरीने इतरही काही छोट्यामोठ्या गोष्टींवर काम करत असतं. कधी कधी हे एवढे सगळे तपशील कॉनली आपल्याला का पुरवतोय असा विचारही वाचकाच्या मनात येऊन जातो. परंतु प्रसंगी बिनमहत्त्वाच्या किंवा किंचित असंबद्ध वाटणाऱ्या त्या गोष्टींचे दुवे नायक (अर्थात कॉनली) कुठे आणि कसे जोडतो ते पाहून वाचक हतबुद्ध होऊन जातो.

कॉनलीच्या कादंबऱ्यांमध्ये पोलिस तपास, तपासातल्या किचकट प्रक्रिया आणि कार्यपद्धती यांचा कीस पाडलेला असतो. कायदेप्रक्रिया, न्यायसंस्था यांमधल्या अतिशय बारीकसारीक मूल्यांचा आणि तत्त्वांचा अत्यंत बारकाईने विचार केलेला असतो. कॉनलीच्या कादंबऱ्यांमधले खलनायक अतिशय विक्षिप्त, खुनशी आणि चमत्कारिक असतात. बऱ्याचदा नायकाचा सामना हा सिरीयल किलरशी होत असतो. प्रत्येक सिरीयल किलर हा त्याला पटणाऱ्या एका ठरावीक पॅटर्ननुसार काम करत असतो. तो पॅटर्न शोधणं, गुन्हेपद्धती शोधणं, सिरीयल किलर अथवा खलनायकाची मानसिकता, भूतकाळ आणि त्याची सामाजिक, कौटुंबिक पार्श्वभूमी इत्यादी महत्त्वाच्या गोष्टींची गुन्ह्याशी सांगड घालून तो गुन्हेगार भविष्यात करू शकणारा गुन्हा रोखणं अशा बहुढंगी जबाबदाऱ्यांचं ओझं नायकाच्या खांद्यांवर असतं. शक्यतो शेवटची ६०-७० पानं शिल्लक असताना एखादी प्रचंड महत्त्वाची घटना घडते जिच्यामुळे तोपर्यंतची सगळी समीकरणंच उलटसुलट होऊन जातात, परिस्थिती आमूलाग्र बदलून जाते, समोर उभ्या ठाकलेल्या परिस्थितीकडे नायकाला पूर्णतः वेगळ्या दृष्टिकोनातून बघावं लागतं. कादंबरीच्या अखेरीस गुंतागुंतीच्या प्रकरणाची उकल झाल्यानंतर कादंबरीभर जाणवत राहणारा, प्रमुख पात्राच्या मनावरचा ताण ओसरतो; परंतु त्या प्रकरणाचा परिपाक म्हणून नायकाच्या वैयक्तिक किंवा व्यावसायिक आयुष्यात प्रचंड उलथापालथ होते, जी भरून येण्यासाठी काही महिन्यांचा/वर्षांचा कालावधी जावा लागतो.

कुठलीही कादंबरी वाचत असताना कॉनलीने त्या विषयाचा, पात्राचा, घटनेचा, भूतकाळात त्यासारख्या घडलेल्या इतर अनेक घटनांचा आणि गुन्ह्यांचा अतिशय बारकाईने अभ्यास केलेला असतो हे वारंवार जाणवत राहतं. एखादा गुन्हा, सिरीयल किलर, त्याची गुन्हे करण्याची पद्धती, कारणमीमांसा, प्रत्यक्ष जगातल्या सिरीयल किलर्सशी जोडलेले संदर्भ आणि त्यातून जाणवणारं गुन्ह्यांमधलं साधर्म्य जेव्हा कॉनली वाचकांसमोर मांडतो त्यावेळी त्याच्या बुद्धीचातुर्याला दाद द्यायला शब्द कमी पडतात. त्याचबरोबर कॉनली आपल्या मानसपुत्रांचा/कन्यांचा जेवढा बारकाईने अभ्यास करतो, त्यांचा भूतकाळ, त्यांची भविष्यात येणारी पुस्तकं, एखादा नवीन नायक/नायिका जन्माला घालायची असल्यास त्या भविष्यातल्या पात्राबद्दल येणारे उल्लेख इत्यादी गोष्टी आणि त्यामागचा कॉनलीचा त्याच्या व्यक्तिरेखांचा अभ्यास आणि पात्रांच्या स्वभाववैशिष्ट्यांमागची सुस्पष्टता वाचकांना स्तंभित करून सोडते! उदाहरणच द्यायचं झाल्यास त्याच्या 'ब्लड वर्क' या १९९८ साली प्रकाशित झालेल्या कादंबरीत

मन ओळखणाऱ्यांपेक्षा मन जपणारी माणसं हवीत; कारण 'ओळख' ही क्षणभरासाठी असते
तर जपवणूक आयुष्यभरासाठी

एका पात्राचा ओझरता उल्लेख आहे ज्या पात्रावर कॉनलीने २००५ साली पूर्ण लांबीची कादंबरी आणि कालांतराने संपूर्ण पुस्तक मालिकाच प्रकाशित प्रकाशित केली.

**पात्रपरिचय :**

हॅरी बॉश, लिंकन लॉयर, टेरी मॅकॅलब, जॅक मॅकइव्हॉय आणि रेनी बॅलर्ड या पाच प्रमुख पात्रांना केंद्रस्थानी ठेवून कॉनलीचं ३८ कादंबऱ्यांचं कॉनली युनिव्हर्स आकाराला आलेलं आहे. ही पाच पात्रं एकमेकांच्या विश्वात ये-जा करत असतात. प्रत्येक पात्राची स्वतंत्र असलेली अशी किमान एक कादंबरी आहे, ज्याद्वारे त्या पात्राचं सर्वप्रथम कॉनली विश्वात आगमन होतं. त्यानंतरच्या जवळपास प्रत्येक कादंबरीत मूळ पात्राच्या बरोबरीने बॉशचंही दर्शन होतं. अर्थात बॉश हे कॉनलीचं फ्लॅगशिप उत्पादन असल्याने आणि त्याचप्रमाणे कॉनली विश्वातलं सर्वात ज्येष्ठ आणि श्रेष्ठ पात्र असल्याने त्याला झुकतं माप मिळणं स्वाभाविकच आहे. आणि त्यामुळेच कॉनली विश्वातील सर्वाधिक अर्थात २१ पुस्तकांमध्ये बॉश नायक आहे. साधारण आठ-दहा वर्षं बॉशने एकट्याने राज्य केल्यानंतर कॉनलीने हळूहळू अन्य पात्रांना वाचकांच्या भेटीला आणायला सुरुवात केली. त्या पात्रांच्याही साधारण दुसऱ्या-तिसऱ्या पुस्तकांपासून त्यांच्या विश्वात बॉशचा प्रवेश होतो आणि त्या दोघांच्या एकत्र काम करण्याने गुन्ह्याची उकल केली जाते. या सर्व पात्रांचा थोडक्यात परिचय करून घेऊ.

१. हॅरी बॉश : लॉस अँजलस पोलिस खात्यात नोकरीला असलेल्या या ज्येष्ठ पोलिस अधिकाऱ्याचा भूतकाळ थोडा काळवंडलेला आहे. त्याने व्हिएतनाम युद्धात भाग घेतलेला आहे. एका वारांगनेच्या पोटी जन्माला आलेला आणि बालपणीच अनाथ होणं नशिबी आल्याने विविध फॉस्टर होम्स (अनाथालये) मध्ये लहानाचा मोठा झालेला बॉश स्व-कर्तृत्वावर मोठा होऊन लॉस अँजलस पोलिस खात्यात डिटेक्टिव्ह म्हणून काम करत असतो. पंधराव्या शतकातल्या Hieronymus Bosch नावाच्या आपल्या आवडत्या डच चित्रकाराच्या नावावरून त्याच्या आईने 'हॅरी बॉश' हे त्याचं नाव ठेवलेलं असतं. द लास्ट कायोटी (The Last Coyote) या बॉशच्या चौथ्या पुस्तकात कॉनलीने Hieronymus Bosch चा इतिहास अतिशय तपशीलवारपणे लिहून ठेवला आहे. एखाद्या पात्राचं नाव, त्याची कौटुंबिक पार्श्वभूमी, त्याच्या स्वभावातले कंगोरे हे सगळं व्यवस्थितपणे उलगडून दाखवण्यासाठी एखादा लेखक इतिहास आणि त्यातल्या व्यक्तिरेखांचा एवढा सखोल अभ्यास करू शकतो हा निदान मराठी फिक्शन वाचकांसाठी तरी मोठा सुखद असा धक्का आहे.

हॅरी बॉशचं व्यक्तिमत्त्व तसं सर्वसामान्य आहे. मध्यम उंची आणि साधारण शरीरयष्टी असलेला बॉश चटकदार, चमकदार संवादफेक करताना दिसत नाही. त्याच्या व्यक्तिरेखेचं सर्वात मोठं वैशिष्ट्य आहे ते म्हणजे त्याची चिकाटी आणि जिद्द. कुठे आशेचा किरणही दिसत नसताना किंवा गुन्हेगारांनी कुठल्याही पुराव्याचा मागमूसही मागे सोडला नसतानादेखील बॉश आपल्या उत्तुंग अनुभवाच्या आणि चिकाटीच्या माध्यमातून अशक्य वाटणाऱ्या भल्याभल्या केसेस सोडवताना दिसतो. आदर्शवाद चोखाळणाऱ्या आणि स्वभावाने किंचित तापट असलेल्या बॉशचे कित्येकदा वरिष्ठांशी मतभेद होत राहतात. अनेक केसेसमध्ये रहस्याचा गुंता सोडवण्यात तो यशस्वी होत असला तरी कित्येकदा लालफीत, सरकारी नोकर, वरिष्ठ अधिकारी, राजकारणी/उद्योगपती आणि गुन्हेगारांचे लागेबांधे यांमुळे अनेक केसेसमध्ये मुख्य आरोपी सुटून गेल्याचं पहाणंही त्याच्या नशिबी येतं. काही वेळा अपयशांनंतर डिपार्टमेंट सोडून गेल्यानंतरही किंवा निवृत्त झाल्यानंतरही काही वर्षांनी तो परत येत राहतो आणि गुन्हेगारांना गजाआड

---

कुणावाचून कुणाचे काहीच अडत नाही, हे जरी खरे असले;
तरी कोण कधी उपयोगी पडेल हे सांगता येत नाही!

पाठवण्यासाठी पोलिसांना शक्य तितकी सर्व मदत करत राहतो. प्रत्येक पुस्तकागणिक प्रगल्भ होत जाणाऱ्या त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रवास हा वाचकांना नक्कीच भुरळ घालणारा ठरतो.

२. लिंकन लॉयर : लिंकन लॉयर म्हणून प्रसिद्धी पावलेल्या या डिफेन्स लॉयरचं खरं नाव मिकी हॉलर आहे. कार्यालयाचा खर्च वाचवण्यासाठी लिंकन कंपनीच्या प्रशस्त गाड्यांमध्ये बसून आपला व्यवसाय चालवणारा वकील म्हणून याला 'लिंकन लॉयर' हे नामाभिधान मिळालेलं असतं. हा डिफेन्स लॉयर असल्याने अर्थातच गुन्हेगार, खुनी, ड्रग डीलर्स, दरोडेखोर, फुटकळ चोर असे लोक ही याची प्रमुख गिऱ्हाईकं आहेत. 'Holler for Haller' असं चटपटीत स्लोगन वापरणारा हा वकील भल्याबुऱ्याची फारशी चाड ठेवण्याच्या फंदात पडत नाही आणि अनेकदा त्याची ग्राहक मंडळीही त्याला ती ठेवण्यापासून परावृत्त करतात. नेहमी सुटाबुटात वावरणारा, उंची गाड्या वापरणारा, छानछोकीची आवड असणारा असा हा नायक आहे. याच्या तोंडी मात्र कॉनलीने याच्या व्यक्तिमत्त्वाला शोभतील असे चटकदार संवाद घातले आहेत.

मिकी नायक असलेली एकूण सात पुस्तकं आहेत. पहिली दोन पुस्तकं (अनुक्रमे लिंकन लॉयर (२००५) आणि ब्रास वर्डीक्ट (२००८) ही फार कमाल उतरली आहेत. ती वाचत असताना वाचक पानोपानी कॉनलीला दाद देत राहतो. २०१० साली प्रकाशित झालेल्या तिसऱ्या पुस्तकात (The Reversal) कॉनलीने मिकीला चक्क सरकारी वकील म्हणूनही रंगवण्याचा प्रयत्न करून पाहिला. परंतु इतर पुस्तकांच्या मानाने हा प्रयत्न थोडा फसल्यासारखा वाटतो हे निश्चित. 'द फिफ्थ विटनेस' (२०११) या मिकीच्या चौथ्या पुस्तकात तर कॉनलीने पुस्तकाच्या शीर्षकातच एक भन्नाट खेळ खेळला आहे. अमेरिकन न्यायव्यवस्थेनुसार काही कारणामुळे एखाद्या साक्षीदाराला साक्ष द्यायची इच्छा नसल्यास खुद्द न्यायालयासमोर उभं राहून तसं स्पष्टपणे सांगण्याचा त्याला पूर्ण अधिकार असतो. अमेरिकन घटनेच्या Fifth Amendment नुसार साक्षीदाराला हा अधिकार बहाल करण्यात आलेला आहे. या पुस्तकातला अत्यंत महत्त्वाचा साक्षीदार हा साक्षीदार क्रमांक ५ आहे. पुस्तकाच्या शीर्षकातच कॉनलीने या फिफ्थ अमेंडमेंट आणि साक्षीदार क्रमांक ५ या दोन गोष्टींची चातुर्यपूर्ण सांगड घातली आहे. शीर्षकाचं महत्त्व अर्थात पुस्तकाच्या मध्यावर वाचकांच्या लक्षात येतं आणि कॉनलीच्या अफाट बुद्धीचातुर्याला आपण मनोमन दाद देतो! मिकीची गुन्हेगारी विश्वाशी असलेली नको तितकी जवळीक पाचव्या (२०१३) आणि सहाव्या (२०२०) पुस्तकांमध्ये (The Gods of Guilt आणि The Law of Innocence) तर त्याच्या चांगलीच अंगलट येते. पण प्रचंड बुद्धिमत्ता, कायद्याचं ज्ञान यामुळे त्या सगळ्यांतून तो सुखरूपपणे बाहेर पडतो. दुसऱ्या पुस्तकादरम्यान नेहमीप्रमाणे हॅरीचं आगमन झाल्यावर ते दोघे सावत्र भाऊ असल्याचं प्रेक्षकांना समजतं. (जे खुद्द हॅरीलाही काही वर्षांपूर्वीच कळलेलं असतं). मिकीचं कायदेविषयक ज्ञान, गुन्हेगारी जगताशी असलेल्या त्याच्या ओळखी आणि त्या योग्य वेळी वापरण्याचं त्याचं कसब, कुठल्याही प्रकरणाच्या तळापर्यंत जाऊन चिकाटीने त्याचा शोध घेऊन रहस्याची उकल करणं हे त्याच्या स्वभावाचे काही महत्त्वाचे गुणविशेष. कॉनलीच्या समर्थ लेखणीतून उतरलेले हे प्रसंग आणि वर्णनं वाचणं ही वाचकांसाठी एक खरीखुरी पर्वणी ठरते.

३. जॅक मॅकइव्हॉय : जॅक मॅकइव्हॉय आणि कॉनली यांच्यात एवढं साम्य आहे की, कॉनलीने आत्मचरित्रात्मक लिखाण करून स्वतःचंच पात्र पुस्तकात उभं केलं आहे असं म्हटल्यास वावगं ठरू नये. अर्थात कॉनलीने हे मान्यच केलं आहे की, मी आत्तापर्यंत निर्माण केलेल्या

---

माणसाचं छोटं दु:ख जगाच्या मोठ्या दु:खात मिसळून गेलं, की त्याला सुखाची चव येते!

पात्रांपैकी माझ्याशी सर्वाधिक साधर्म्य साधणारं पात्र म्हणजे मॅकइव्हॉय. मॅकइव्हॉय हा देखील कॉनलीप्रमाणेच एका लहान वृत्तपत्रात गुन्हेगारी जगताच्या बातम्या देणारा वार्ताहर म्हणून नोकरी करत असतो. १९९६ साली प्रकाशित झालेलं 'द पोएट' हे मॅकइव्हॉय सिरीज मधलं पहिलं पुस्तक ज्यात कॉनलीने बॉश व्यतिरिक्त अन्य एखादं पात्र नायक म्हणून चितारलं आहे. पुस्तकाच्या सुरुवातीलाच मॅकइव्हॉयच्या आयुष्यातल्या एका महत्त्वाच्या व्यक्तीने आत्महत्या केल्याने त्याला त्या घटनेचा भयंकर धक्का बसलेला असतो. काही दिवसांनी थोडा सावरल्यानंतर त्याला त्यात काहीतरी काळंबेरं आहे असा संशय यायला लागतो. थोडं अधिक खणून पाहिलं असता ही मृत्यूंची एक मालिकाच असल्याचं त्याच्या लक्षात येतं. अधिक खोलवर चौकशी करून अनेक धागे जुळवल्यानंतर तर अजून एक धक्कादायक गोष्ट त्याच्या लक्षात येते की, हे मृत्यू साधेसुधे नसून त्यामागे एक विलक्षण असा पॅटर्न आहे. आणि या अनुमानापर्यंत पोचल्यावर हळूहळू प्रत्यक्ष गुन्हेगार कोण आहे याचा साधारण अंदाज आल्यावर तर त्याला अजूनच धक्का बसतो. पानागणिक विलक्षण रंगत जाणारा कुत्र्यामांजराचा खेळ, पाठलाग, निरनिराळे गुप्त दुवे आणि त्यांची सांगड, त्यासाठी मॅकइव्हॉयला मदत करणारी एक महिला अधिकारी, तिचा वरिष्ठ अधिकारी, अन्य सहकारी आणि त्यांच्यातलं राजकारण असे निरनिराळे विलक्षण टप्पे घेत पुस्तक शेवटाकडे येतं आणि वाचकांना कमालीचं हादरवून टाकतं.

मॅकइव्हॉय हा प्रचंड हुशार वार्ताहर आहे. यंत्रणेतले कच्चे दुवे कोळून पिऊन त्यांचा फायदा बातमी देण्यासाठी कसा करता येईल याचा हिशोब त्याच्या डोक्यात सदैव चालू असतो. 'स्केअरक्रो' (२००९) आणि 'फेअर वॉर्निंग' (२०२०) ही मॅकइव्हॉय मालिकेतली अन्य दोन पुस्तकं असून, या दोघांमधेही काही विशिष्ट लोकांच्या हत्या, त्यांचा एक विशिष्ट पॅटर्न, त्यांच्यातले सामायिक दुवे, ते शोधण्यासाठी चालू असलेली मॅकइव्हॉयची धडपड हे सगळे टप्पे थोड्याफार फरकाने तसेच घडतात. मात्र प्रत्येक पुस्तकातले गुन्हे, त्यांची वारंवारता, गुन्हेगारांची मानसिकता, गुन्ह्यांचे अभिनव प्रकार इत्यादी गोष्टींमधल्या बारीसारीक तपशिलांचा कॉनलीने अतिशय बारकाईने केलेला अभ्यास वाचकांना अक्षरशः थक्क करून सोडणारा आहे.

४. टेरी मॅकॅलब : एक LAPD चा डिटेक्टिव्ह, एक बचावपक्षाचा वकील आणि एक गुन्हेगारी जगताशी संबंधित बातम्या देणारा वार्ताहर झाल्यानंतर कॉनलीने पुढचं पात्र एका निवृत्त FBI अधिकाऱ्याच्या रूपात रंगवलं आहे. टेरी मॅकॅलब हा FBI मध्ये क्रिमिनल प्रोफायलर म्हणून काम करत असतो. प्रत्यक्ष गुन्ह्यांच्या घटना, घटनास्थळाची परिस्थिती, गुन्हा करण्याची पद्धत इत्यादी गोष्टींवरून गुन्हेगारांची मानसिकता जाणून घेऊन गुन्हा करणाऱ्या व्यक्तीची पार्श्वभूमी कशी असेल याचा शोध घेणं ही घेणं हे टेरीची प्रमुख जबाबदारी असते. 'ब्लड वर्क' (१९९६) या पहिल्या पुस्तकात व्यक्तिगत कारणांमुळे नाईलाजाने निवृत्त व्हावं लागलेल्या टेरीसमोर अचानकच अशी काही गुंतागुंतीची परिस्थिती निर्माण होते की, त्याला एका शेवटच्या परंतु शब्दशः जीवन-मरणाचा प्रश्न ठरलेल्या केससाठी निवृत्त आयुष्यातून तात्पुरत्या काळासाठी परत यावं लागतं. परंतु आता निवृत्त झालेला असल्याने FBI तर्फे मिळणारी कुठलीही साधनं किंवा मदत त्याच्या पाठीशी नसते. मात्र केस आत्यंतिक महत्त्वाची असल्याने तिचा छडा न लावता स्वस्थ बसणंही त्याला शक्य नसतं. परंतु आपल्या अपूर्व बुद्धिचातुर्याच्या बळावर अवघड परिस्थितीवर मात करून टेरी त्या अविश्वनीय वाटणाऱ्या केसचा धक्कादायक उलगडा करतो.

टेरी मॅकॅलब सिरीजमधलं दुसरं पुस्तक म्हणजे 'अ डार्कनेस मोअर दॅन नाईट' (२०००) ज्यात टेरीच्या सोबतीला बॉश येतो आणि दोघे मिळून अजून एका अशाच धक्कादायक गुन्ह्यांच्या मालिकेचा तपास पूर्ण करतात. यात अमेरिकन तपाससंस्थांमधले आपापसातले हेवे-दावे, राजकारण आणि त्याचबरोबर विक्षिप्त गुन्हेगारांची मानसिकता अशा निरनिराळ्या पैलूंवर कॉनली भाष्य करतो.

५. रेनी बॅलर्ड : गुन्हे आणि गुन्हेगारांशी संबंधित निरनिराळ्या क्षेत्रातल्या पात्रांचे प्रकार लीलया हाताळून झाल्यावर, कॉनलीने रेनी बॅलर्ड नावाच्या महिला डिटेक्टिव्हचं पात्र वाचकांच्या भेटीला आणलं आहे. बॅलर्डचं विशिष्ट्य म्हणजे अतिशय तल्लख बुद्धिमत्ता असूनही अंतर्गत राजकारण, तुलनेने कमी अनुभव आणि तिचं 'महिला' असणं या सगळ्या बाबींचा एकत्रित परिणाम म्हणून तिला रात्रपाळीत काम करावं लागत असतं. आणि त्यामुळेच तिच्या पहिल्या पुस्तकाचं नाव आहे 'द लेट शो' (२०१७). दिवसभरात घडलेल्या गुन्ह्यांच्या नोंदी एकत्रित करून त्या वरिष्ठांना पाठवणे असं अत्यंत नीरस आणि रटाळ काम तिच्या माथी मारण्यात आलेलं असतं. मात्र ते कंटाळवाणं कामही नियमितपणे पूर्ण करून, जोडीला सध्या चालू असलेल्या केसेसच्या तपासांचे अहवाल वाचून, समजून घेऊन गुन्ह्यांचा तपास आपल्या पद्धतीने करणे, तपासात एखादा कळीचा मुद्दा राहून गेला असल्यास त्याकडे वरिष्ठांचं लक्ष वेधून घेणे अशी लहान पण अतिशय महत्त्वाची कामं बॅलर्ड करत असते.

शहरातल्या गजबजलेल्या परिसरातल्या एका उपाहारगृहात झालेल्या एका रँडम हत्याकांडाची चौकशी चालू असते. अर्थात बॅलर्डपर्यंत त्यातलं काहीच येत नसतं. तरीही ती तिच्या पद्धतीने शोध घेत त्या हत्याकांडातले महत्त्वाचे दुवे शोधून काढते आणि अखेरीस पोलिस खात्याला हादरवून टाकणाऱ्या एका धक्कादायक सत्याला वाचा फोडते. 'द लेट शो' नंतर बॅलर्ड सिरीजमधल्या अजून चार कादंबऱ्या प्रकाशित झालेल्या असून पुढची कादंबरी 'द वेटिंग' ही १५ ऑक्टोबरला प्रकाशित होणार आहे. गंमत म्हणजे हॅरी बॉशची मुलगी एव्हाना मोठी झाली असून, तीही आता LAPD मध्ये जॉईन झाली असून, ती आणि बॅलर्ड एकत्रितपणे एका जुन्या, न सुटलेल्या गुन्ह्यांवर काम करत आहेत.

**चित्रपट आणि मालिका :**

कॉनलीसारख्या अमाप लोकप्रियता प्राप्त झालेल्या लेखकाच्या कादंबऱ्यांवर आणि पात्रांवर चित्रपट आणि मालिका प्रदर्शित झाल्या नसत्या तरच नवल! बॉश या त्याच्या सर्वाधिक लोकप्रिय असलेल्या पात्रावर त्याच नावाची सात सीझन्सची मालिका प्राईमवर प्रदर्शित झाली. Titus Welliver ने छोट्या पडद्यावर रंगवलेला बॉश चाहत्यांना कमालीचा आवडला. मालिकेतल्या सीझन्सची मांडणी ही अर्थात पुस्तकांच्या अनुक्रमानुसार नसून २-३ रँडम कादंबऱ्या एकत्रित करून एकेका सिझनची निर्मिती करण्यात आली आहे. ही मालिका २०२१ साली संपल्यानंतर पुढच्याच वर्षी, अर्थात २०२२ मध्ये 'बॉश लेगसी' या नावाने तिचा स्पिनऑफही प्रदर्शित झाला. या स्पिनऑफ मालिकेचेही दोन सीझन्स झाले असून, तिसरा सिझन या वर्षअखेरीस येणं अपेक्षित आहे.

कॉनलीचा बॉश खालोखाल लोकप्रिय असलेला अन्य नायक म्हणजे लिंकन लॉयर. लिंकन लॉयरच्या पहिल्या पुस्तकावर २०११ साली चित्रपट प्रदर्शित झाला असून, Matthew McConaughey ने साकारलेला मिकी कमालीचा लोकप्रिय ठरला. त्यानंतर नेटफ्लिक्स वर २०२२ आणि २०२३ साली त्याच्या अनुक्रमे दुसऱ्या आणि तिसऱ्या पुस्तकांवर आधारित दोन सीझन्स प्रदर्शित झाले. त्यात Manuel Garcia-Rulfo या अभिनेत्याने

मिकी साकारला. कॉनलीच्या पुस्तकविश्वातली पात्रं एकमेकांच्या पुस्तकात सहजपणे ये-जा करत असली तरी दुर्दैवाने मालिकाविश्वात मात्र हा आनंद तांत्रिक बाबीमुळे प्रेक्षकांकडून हिरावून घेतला गेलाय. 'लिंकन लॉयर'चे हक्क नेटफ्लिक्सकडे आणि 'बॉश' मात्र प्राईमकडे असल्याने त्यांचं एकमेकांच्या विश्वात डोकावणे सर्वस्वी अशक्य आहे.

कॉनलीच्या टेरी मॅकॅलब नायक असलेल्या 'ब्लड वर्क' या अत्यंत लोकप्रिय कादंबरीवरदेखील २००२ साली एक चित्रपट निर्माण झाला होता. टेरीची प्रमुख भूमिका आणि त्याचबरोबर दिग्दर्शन या दोन्ही जबाबदाऱ्या हॉलीवूडचे ज्येष्ठ श्रेष्ठ आजोबा क्लिंट ईस्टवूड यांनी स्वतःच्या खांद्यावर घेतल्या होत्या. परंतु ब्लड वर्क कादंबरीतील रहस्य, टेरीचा संघर्ष, शोधाचा प्रवास आणि त्यादरम्यान येणारे विविध अडथळे यातल्या कुठल्याच गोष्टी चित्रपटात मूळ कादंबरीच्या १% ही न दाखवता आल्याने दुर्दैवाने चित्रपटाचा पार बोजा उडाला असून, शेवटाकडे तर चित्रपट अक्षरशः हास्यास्पद होऊन गेला आहे. (कादंबरी न वाचता थेट चित्रपट बघणाऱ्या एखाद्या व्यक्तीला चित्रपट कदाचित आवडूही शकेल.)

**वाचनक्रम :**

कुठल्याही लेखकाची पुस्तकं ही त्याने ती ज्या क्रमाने लिहिली आहेत, शक्यतो त्या क्रमानेच वाचणं ही माझ्या दृष्टीने सगळ्यात आदर्श पद्धत आहे आणि ती मी जवळपास प्रत्येक वेळी पाळतोही. अशा प्रकारे वाचन केल्याने लेखकाच्या लेखनशैलीतली आणि त्याचबरोबर त्याच्या प्रमुख पात्राच्या व्यक्तिमत्त्वातलीही उत्क्रांती लक्षात यायला आपल्याला मदत होते. कॉनलीच्या बाबतीत मात्र क्रम थोडा बदलला गेला. मी कॉनली वाचायला सुरुवात केली ती लिंकन लॉयर या पात्रापासून. लिंकन लॉयर मालिकेतली पहिली दोन पुस्तकं अर्थात 'लिंकन लॉयर' आणि 'द ब्रास वर्डीक्ट' अक्षरशः झपाटल्यागत वाचली. लिंकन लॉयर वाचायला सुरुवात केल्यानंतर काही प्रकरणांनंतरच मिकी आणि कॉनली ही फारच गुंतागुंतीची आणि उच्च दर्जाची प्रकरणं आहेत हे माझ्या लक्षात आलं. पहिल्या पुस्तकात मिकीने गुन्हेगाराच्या तावडीतून कमालीच्या हुशारीने स्वतःची सुटका करून घेऊन त्या गुन्हेगारालाच अन्य एका सापळ्यात अडकवण्याचा प्रवास अशक्य थरकाप उडवणारा आहे. दुसरी कादंबरी असलेल्या 'ब्रास वर्डीक्ट'चा सगळा डोलारा चित्रविचित्र गुन्हे, तपास, कादंबरीचा कमालीचा वेग आणि मिकीचे अप्रतिम संवाद यावर उभारलेला असून, या पुस्तकातही वाचक पहिल्या पुस्तकाच्या बरोबरीने गुंतून जातो. अशा तऱ्हेने एकेक करत मिकीची तोवर प्रकाशित झालेली सगळी (७) पुस्तकं वाचून झाल्यानंतर मी बॉशकडे वळलो.

बॉशची पहिली दोन पुस्तकं वाचून झाल्यानंतर मला ती विशेष न आवडल्याने मी बॉशचीच अजून तीन-चार रँडम पुस्तकं संपवली. अगदी प्रामाणिकपणे सांगायचं तर तीही खास न वाटल्याने बॉशला तात्पुरता रामराम ठोकून मी माझा मोर्चा रेनी बॅलर्डकडे वळवला. बॅलर्ड मालिकेतलं पहिलं पुस्तक 'द लेट शो' खूप आवडल्याने ते झाल्यावर लगेचच दुसरं पुस्तक अर्थात 'डार्क सेक्रड नाईट' (२०१८) वाचायला घेतलं. मात्र त्यात बॉशचा प्रवेश झाल्यानंतर पुस्तकाचा वेग थोडा मंदावल्यासारखा वाटल्याने दुसरं पुस्तक संपवल्यानंतर बॅलार्डलाही तात्पुरता निरोप दिला.

कॉनलीचं सर्वात लोकप्रिय पुस्तक कुठलं हे गुगल केल्यावर दहा पैकी नऊ लोक जॅक मॅकइव्हॉयच्या 'द पोएट' या कादंबरीकडे निर्विवादपणे अंगुलीनिर्देश करतात. 'द पोएट' विषयी मी फार पूर्वीपासून ऐकलं असूनही त्याच्या जाडजूड आकारामुळे (पृष्ठसंख्या : ६१०) ते सुरू करायचं धाडस होत नव्हतं. पण अखेरीस एक दिवस रात्री झोपायच्याआधी हिय्या करून वाचायला

घेतलं आणि रात्रीचे दोन वाजून गेले तरी ते ठेवावंसं वाटेना! 'द पोएट' ला स्वतःची अशी एक विलक्षण गती आहे, त्यात अचंबित करून सोडणारे पॅटर्न्स आहेत, निरनिराळी वैशिष्ट्यपूर्ण पात्रं आहेत. त्यांचे भूतकाळ, वर्तमानकाळ निरनिराळ्या टप्प्यांवर सांधले गेलेले आहेत. 'द पोएट' मध्ये दर काही पानांनंतर एक विलक्षण वळण येतं, सगळं संपलं असं वाटायला लागतं आणि तोवर एक नवीन रहस्यभेद झालेला असतो. हा असा प्रकार सातत्याने करून वाचकांना संपूर्ण कादंबरीभर जखडून ठेवण्याचं आव्हान कॉनलीने लीलया पेललंय. कित्येकदा मी दिवसभर बेचैन होऊन जायचो की, पुस्तकात आता पुढे काय होणार असेल?, जॅकला खऱ्या खुन्याचा शोध लागेल का? तर अनेकदा रेचल अशी का वागते आहे? सिरीयल किलरचा पुढचा प्लॅन नक्की काय असेल? यांसारख्या प्रश्नांचा विचार करकरून मला दिवसभर इतर काही सुचायचंच नाही. या दरम्यान कित्येक रात्री मला पोएट, जॅक, रेचेलची स्वप्नं पडली आहेत. एखाद्या कादंबरीने एवढं झपाटून टाकण्याचा असा अनुभव मी कैक वर्षांनी घेत होतो!

'द पोएट'चा शेवट हा किंचित ओपन एंडेड असल्याने लगेच त्याचा दुसरा भाग अर्थात 'द नॅरोज' (२००४) वाचायला घेतला. आश्चर्य म्हणजे द पोएटचा नायक असलेल्या जॅकचा या कादंबरीत साधा उल्लेखही नाहीये! 'द नॅरोज'ची सुरुवातीची सुमारे पन्नासेक पानं वाचून झाल्यावर त्यात टेरी मॅकॅलबचे भूतकाळातले आणि बॉश आणि टेरीने यापूर्वी एकत्र काम केल्याचे उल्लेख यायला लागले. तोवर मी टेरी मॅकॅलब नायक असलेली एकही कादंबरी वाचली नव्हती. त्यामुळे नॅरोज व्यवस्थित समजून घेण्यासाठी टेरीचं नॅरोजच्या आधीचं पुस्तक अर्थात 'अ डार्कनेस मोअर दॅन नाईट' वाचणं आवश्यक आहे हे लक्षात आलं. आता 'डार्कनेस..' सुरू केल्या केल्या त्यात टेरीच्या त्याआधीच्या पुस्तकातली आश्चर्यकारक केस आणि रहस्यांचे उल्लेख वारंवार येतायत् हे लक्षात आलं. यावेळी मात्र वीसेक पानांमधेच हे लक्षात आलं की 'डार्कनेस..' वाचण्यापूर्वी त्यापूर्वीचं आणि अर्थात टेरी नायक असलेलं पहिलं पुस्तक 'ब्लड वर्क' (१९९८) वाचल्याशिवाय काही हा गुंता सुटणार नाही. त्यामुळे ताबडतोब 'ब्लड वर्क' वाचायला घेतलं. 'ब्लड वर्क' सुरू केल्यावर पुन्हा एकदा 'द पोएट' सारखीच अवस्था होऊन बसली. 'ब्लड वर्क' अक्षरशः झपाटल्यागत संपवलं आणि अक्षरशः थक्क होऊन कॉनलीला मनोमन लक्षावधी वेळा साष्टांग दंडवत घातले!

त्यानंतर हे सगळं प्रकरण जिथून सुरू झालं होतं त्या जॅक मॅकइव्हॉयकडे परत जाणं भागच होतं. 'द स्केअरक्रो' (२००९) आणि 'फेअर वॉर्निंग' (२०२०) या जॅकच्या अनुक्रमे दुसऱ्या आणि तिसऱ्या पुस्तकाच्या वाचनानंतर जॅक मॅकइव्हॉय प्रकरण एकदाचं सुफळ संपूर्ण झालं. स्केअरक्रो आणि फेअर वॉर्निंग ही पोएटच्या तुलनेत सामान्य म्हणता येण्यासारखी असली तरीही त्यातल्या सीरियल किलर्सचे स्वभाव, कार्यपद्धती, खून करण्याच्या अजब पद्धती इत्यादी बाबींवर कॉनलीने केलेलं संशोधन वाचकांना तोंडात बोटं घालायला भाग पाडेल असं आहे.

**आवडती पुस्तकं, आवडती पुस्तक-मालिका आणि आवडतं पात्र :**

माझ्या आवडत्या टॉप-५ कॉनली कादंबऱ्यांची यादी करणं खरं तर फार अवघड आहे. कारण फार न आवडलेल्या काही कादंबऱ्यांमध्येदेखील काही काही गोष्टी, घटना, प्रसंग, वर्णनं इतकी विलक्षण आहेत की, ती पुनःपुन्हा वाचावीशी वाटत राहतात. तरीही टॉप-५ नावं काढायचीच झाल्यास ती पुढीलप्रमाणे असू शकतील. (ही यादी व्यक्तिपरत्वे बदलेल हे तर ओघानेच आलं.

पण तरीही एखाद्या वाचकाला कॉनली वाचायला सुरुवात करायची असल्यास तर या क्रमाने वाचल्यास कॉनलीच्या लेखणीचं सामर्थ्य लक्षात येण्यास मदत होऊ शकते.)

१. द पोएट
२. लिंकन लॉयर
३. द ब्रास वर्डीक्ट
४. ब्लड वर्क
५. फेअर वॉर्निंग

माझी सर्वाधिक आवडती पुस्तक मालिका ही निर्विवादपणे 'लिंकन लॉयर' हीच आहे. लिंकन लॉयर मालिकेतली पुस्तकं उत्तरोत्तर मुरत जातात, अधिकाधिक रंगत जातात. मिकी, त्याचे सहकारी, 'त्याच्या' घटस्फोटित पत्नी, त्याचा ड्रायव्हर, त्याचा इन्वेस्टीगेटर अशा सर्व पात्रांची व्यक्तिचित्रं प्रत्येक कादंबरीगणिक अधिकाधिक सुस्पष्ट होत जातात. दर पुस्तकागणिक मिकी समोर उभी राहणारी नवनवीन आव्हानं, त्यांना तोंड देत, धडपडत दर वेळी नव्या दमाने उभा राहणार मिकी, सरकारी यंत्रणेतल्या पळवाटा शोधून काढून त्यांचा आपल्या अशिलांसाठी आणि अर्थातच स्वतःसाठी फायदा करून घेणारा धडपड्या मिकी, पाचव्या आणि सहाव्या पुस्तकात तर थेट जीवावर बेतलेल्या संकटांना परतवून लावणारा मिकी, सातव्या पुस्तकात वारंवार अपयशी ठरून, लहान लहान लढाया हरूनही अखेरीस महत्त्वाचं युद्ध जिंकणारा मिकी हा सगळा कधीही न विसरता येण्याजोगा आणि प्रत्येकाने आवर्जून घ्यावा असा अनुभव आहे.

लिंकन लॉयरची पुस्तक-मालिका कितीही आवडती असली तरीही माझं सगळ्यात आवडतं पात्र हे जॅक मॅकइव्हॉय हेच आहे. द पोएट आणि फेअर वॉर्निंग मध्ये त्याने दाखवलेला शोध पत्रकारितेचा उत्कृष्ट नमुना, त्याची निर्भय पत्रकारिता, जिद्दी, धडपड्या आणि कधीही हार न मानणारा स्वभाव यामुळे मॅकइव्हॉयला पर्यायच नाही! (त्यानंतर अर्थातच मिकीचाच नंबर लागेल हे निश्चित). आणि त्यामुळेच मला ज्या एका गोष्टीचं अत्यंत आश्चर्य आणि तेवढंच दुःखही वाटत राहतं ती म्हणजे 'द पोएट' सारखी अप्रतिम कलाकृती आत्तापर्यंत छोट्या-मोठ्या पडद्यावर आलेली नाही! 'द पोएट' मध्ये असलेली गुंतागुंत पाहता हा एका अडीच-तीन तासांच्या चित्रपटात कोंबून बसवण्याचा प्रकार नाही हेही तितकंच खरं असलं, तरी त्यावर एखादी पूर्ण लांबीची नाही तर निदान एखादी मिनीसिरीज तरी आवर्जून निर्माण केली जावी अशी माझी फार इच्छा आहे.

एखादी उत्तम कलाकृती जन्माला घालणं, एखादं विलक्षण पात्र एखाद्या कादंबरीपुरतं उभं करणं ही बाब कितीही अवघड असली तरी अशक्य खचितच नाही. अशक्य बाब ही आहे की; अप्रतिम पात्रं, बांधीव कथा, टोकदार संवाद, स्तंभित करून टाकणाऱ्या घटनांची मांडणी सातत्याने करत राहणं आणि हे सारं वारंवार आणि नियमितपणे करत असताना दर्जाशी कुठेही तडजोड होऊ न देणं.

या सगळ्या गोष्टी वर्षानुवर्षं करत राहणं ही खरोखर अशक्यकोटीतली बाब आहे. पण ती सर्वसामान्य लेखकांसाठी; कॉनलीसारख्या कसलेल्या चतुरस्र चॅम्पियन साहित्यिकासाठी नाही. कॉनली हे रसायनच अजब आहे. त्याचा सातत्याने चालू असणारा रिसर्च, नवनवीन कल्पना, सर्वस्वी नवीन धर्तीच्या गुन्हेकथा इत्यादी पाहता हा माणूस दरवेळी एवढं सगळं नवनवीन आणतो कुठून आणि कसं हा प्रश्न पडत राहतो. पण अर्थात तोही सामान्य वाचकांना; कॉनलीच्या चाहत्यांना नाही. कॉनलीच्या चाहत्यांना एव्हाना माहीत झालेलं असतं की, या साऱ्या गोष्टी कॉनलीसाठी आता सवयीचा भाग झालेल्या आहेत, हे दर्जातलं सातत्य राखणं त्याच्यासाठी नित्यनेमाचा भाग आहे.

---

कारणं सांगणारी लोकं यशस्वी होत नाहीत आणि यशस्वी होणारे लोक कारण सांगत नाही...

वाचकांना सातत्याने गुन्हेविश्वातल्या अनोख्या प्रवासाला नेणाऱ्या, त्यांचं वाचनविश्व समृद्ध करणाऱ्या अशा या मायकल कॉनलीचा आज (२१ जुलै) वाढदिवस. आज कॉनली वयाची ६८ वर्षं पूर्ण करतोय. आयुष्याच्या अर्ध्याहून अधिक काळ दर्जेदार लिखाण करून, वाचकांना मोहून टाकणाऱ्या या किमयागार क्राईम–फिक्शन लेखकाच्या लेखणीतून यापुढेही वाचकांना खिळवून ठेवणारं साहित्य असंच उत्तरोत्तर जन्माला येत राहो या मनोकामनांसह त्याला वाढदिवसाप्रीत्यर्थ हार्दिक शुभेच्छा!

**– हेरंब ओक**

●●●

**विद्या प्रसारक मंडळाच्या नूतन अभियांत्रिकी महाविद्यालयास समर्पित...**

विजय पताका ज्ञान प्रसाराची धरली आम्ही हाती..
तेजावया अनंत ज्ञानदीपू ह्या सर्व त्रिभुवनासी ।।

मिळूनी सारे हृदयी धरू या कास भविष्याची ।

ज्ञान संजीवन मिळो सदैव येथे सृजनासी..
हेच अखंड चैतन्य धरा सर्व मनामनाशी ।।

मिळूनी सारे हृदयी धरू या कास भविष्याची...

यज्ञ सदा तळपत राहो तत्परायण अहर्निशी...
ज्ञान सूर्याची जाणीव सदा होवो सर्व जनमनासी ।।

मिळूनी सारे हृदयी धरू या कास भविष्याची...

वासुदेव द्वारी उभा दिसे सुवर्ण पिंपळ ज्ञानकार्यासी..
अथक कार्याचा तो अमर स्रोत आपणा सर्वांशी ।।

मिळूनी सारे हृदयी धरू या कास भविष्याची...

**– प्रा. अविनाश पवार**
वेळणेश्वर

(पृष्ठ क्र.१२ वरून - **फ्रान्समधील सद्यस्थिती व फ्रेंच राज्यक्रांती पुस्तक**)

ज्याप्रमाणे या घटनेने अत्यंत भारावून गेले होते तसे भारावून जाण्याचे आपल्याला कारण नाही. आपण जे घडले होते त्याच्यावर लक्ष केंद्रित करणे योग्य ठरेल.

या पुस्तकात त्या काळातील महत्त्वाच्या व्यक्तींचा मानसशास्त्रीय प्रभाव त्यांच्यावर आणि समाजावर कसा पडला याचा ऊहापोह केला आहे. त्यांचे आयुष्य, ते कसे जगले आणि ते मृत्यूला कसे सामोरे गेले हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. एकेकाळी उत्तुंग स्थानावर पोहोचलेली ही माणसे एका क्षणात कशी धुळीस मिळाली, ज्यांच्या अंगावर भरजरी पोषाख होते ते नंतर भणंग कसे झाले याचीही ही कहाणी आहे. या माणसांच्या चरित्रामधून उलगडत जाणारा हा फ्रेंच राज्यक्रान्तीचा इतिहास वाचकांना मनोरंजक वाटेल, पण त्याचवेळी त्यांच्या अंगावर काटा उभा करेल याची मला शंका नाही. दोन व्यक्तिचित्रांमधे ऐतिहासिक घटना दिल्या आहेत, ज्यामुळे या कथेमध्ये सुसंगती राहील. ही या व्यक्तिचित्रांना जोडणारी ही पाने नसती तर कदाचित हा इतिहास समजणे अवघड गेले असते.

जगाचा इतिहास म्हणजे त्यातील थोर माणसांचे चरित्रच असते असे उगीच म्हणत नाहीत. या पुस्तकातील नायकांचा असा विश्वास होता की, ते समाजाचे नेतृत्व करत होते आणि ते खरेही होते. पण त्यांचेही नेतृत्व कोणीतरी करत होते हेही स्पष्ट आहे. या पुस्तकात या क्रांतीची कथा सांगितली आहे ती तुम्ही इतरत्र वाचली असेल; पण माणसांचा क्रांतीवरील प्रभाव आणि माणसांवर पडलेला क्रांतीचा प्रभाव या बद्दल तुम्हाला या पुस्तकात वाचायला मिळेल.

**– जयंत कुलकर्णी**
ज्येष्ठ लेखक व अनुवादक
पुणे


●●●

प्रसिद्धी ही अशी बाब आहे, जी कितीही मिळाली तरी माणसाची तहान भागत नाही!

# उंटांची अदभूत रम्य दुनिया
# २०२४ हे आंतराष्ट्रीय कॅमेलीड्सचे वर्ष

*प्रस्तुत लेखाच्या शीर्षकावरून 'उंट' या प्रजातीची माहिती वाचण्याची उत्सुकता प्रत्येकाच्या मनात निर्माण नक्कीच झाली असेल! वाचा तर... - संपादक*

याच वर्षी मी कर्मधर्म संयोगाने, लोकसत्तेचे संपादक गिरीश कुबेर यांचा 'कॅमल कर्मा'ची (Camel Karma) लेखिका इल्स कोलर रोलेफ्सन व जयपूरचे 'लिटफेस्ट' (literature festival) यावर लेख वाचला. मी अतिशय भारावून गेले. माझी ऊत्सुकता खूप ताणली गेली इतकी की, मी पुस्तक विकत घेऊन वाचून काढले.




पुस्तकाची लेखिका गेले पंचवीस वर्षं भारतात राहात आहे. एक जर्मन स्त्री, जिचा या देशाशी, इथल्या मातीशी, संस्कृतीशी दुरान्वयानेही संबंध नाही, अतिशय उष्ण व गरम हवा, भाषेचा गंध नाही, जेवणात तिखट व अतिरिक्त तुपाचा वापर, जो तिला मानवत नाही, रूढ अर्थाने अडाणी जनता, ज्यांच्या स्त्रिया पडद्यांत रहाणाऱ्या, वालूकामय गरम प्रदेश, तरीही उंट व त्याचे पालक व प्रजनन करणाऱ्या जमाती यांच्यावर संशोधन करायला ती भारतात येते. पण नंतर राजस्थानातील उंट व त्यांचे प्रजनन करणाऱ्या रायका जमातीच्या उत्कर्षासाठी व उंटाच्या रक्षणासाठी काम करते. इल्स कोलर राजस्थानमध्ये १९९१ पासून वास्तव्य करून आहे व आपले आयुष्य राजस्थानच्या दुर्गम भागांत राहणाऱ्या रायकां जमातीच्या व त्यांच्या उंटासाठी समर्पित केले आहे. ती LPP ची संस्थापक आहे (league for pastoral peoples). ती २०२४ च्या आंतरराष्ट्रीय कॅमलीडस् या वर्षांची FAO (food and Agriculture organisation) ची सदस्य आहे.

२००२ मध्ये तिला उंट व रायका यांचा वारसा जतन करण्यासाठी, Rolex Association Award मिळाले. २०१४ मध्ये 'मारवाड रत्नवार्ड' व 'नारी शक्ती पुरस्कार' या सर्वोच्च नागरी पुरस्काराने, भारतातील महिलांसाठीचा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान करण्यात आला. पुढील वर्षी, जर्मनीच्या राष्ट्रपतींनी फेडरल रिपब्लिक ऑफ जर्मनीचा ऑर्डर ऑफ मेरिट प्रदान केला. ती Hoofprints on the Land : How Traditional Herding and Grasing Can Restore the Soil and Bring Animal Agriculture Back in the Balance with the Earth (2023) ची लेखिका आहे.

**उंट** – उंट हा भटक्यांचा पौष्टिक आहार आहे. त्यांचे वाहतुकीचे वाहन आहे. आर्थिक व्यवहाराचे माध्यम आहे. नवऱ्यामुलीचा हुंडा आहे. वाळवंटातील शेखांची

सर्व संपत्ती उंटांमध्ये मोजली जाते. तो बदाऊनींचा नेहमीचा सोबती आहे. त्यांचा जिगरी दोस्त आहे. त्यांचा मानलेला पालक आहे. तो पाण्याऐवजी त्याचे दूध पितो. (अतिशय दुर्मीळ असलेले पाणी इतर गुरांसाठी ठेवतो.) तो त्याच्या मांसावर मेजवानी करतो. त्याची कातडी पांघरतो. त्याच्या केसांचा तंबू बनवतो. त्याचे शेण इंधन म्हणून वापरतो व त्याची लघवी केसांसाठी औषध म्हणून वापरतो. उंट हा फक्त वाळवंटातील जहाज नाही तर त्याच्यासाठी अल्लाची देणगी आहे.

Philip k. Hitti, History of the Arabs (1970 )
फिलिप के. हित्ती, अरबांचा इतिहास (१९७०)
March 1979.

उंटाविषयी इल्सची तीव्र आवड जॉर्डनमध्ये निर्माण झाली. उत्तरेकडील एका सुंदर वाडीत (हंगामी नदीचे कोरडे पात्र, अरेबिक) जी जवळच्या जॉर्डन नाल्यात वाहून गेली.

डॉ. कोलर पशुवैद्य असते. ती जॉर्डनमध्ये पुराशास्त्रीय ऊत्खननात जीवशास्त्रीय विश्लेषक म्हणून काम करत होती. तिला, तिच्या जर्मनीतील पशुवैद्यकीय कामातून बदल हवा असतो.

कृत्रिमरीत्या गाईंची गर्भधारणा व डुक्करांच्या पिल्लांचे टेस्टीकल्स काढून टाकणे या कामाचा तिला कंटाळा आलेला असतो. तिला प्राण्यांची आवड असते. तिला हे उत्खननाचे काम आवडते. त्यांच्या टीममध्ये अतिशय खेळीमेळीचे वातावरण असते. त्यांच्या उत्खननाच्या जागेवरून जॉर्डनची घळ दिसत असते. ७००० वर्षांपूर्वीच्या वसाहतीचे उत्खनन करण्यांचे त्यांचे काम असते. उत्खननातील प्राण्यांच्या हाडांच्या ढिगाऱ्यातून त्या काळांतील त्यांचे खाणे व आर्थिक स्थितीची माहिती गोळा करायचे काम असते.

त्यांची ही कामांची जागा हिरवीकंच व फुलांनी भरलेल्या घळी जवळ होती. ती आजूबाजूच्या वसाहतींसाठी पाण्याचा मुख्य स्रोत होती. इल्स रोज सकाळी गावकऱ्यांना गाढवांच्या पाठीवर पाण्याचे कॅन लादतांना बघत असे.

एके दिवशी कामाच्या जागेवरून रमत, गमत चालत असतांना तिला व्हॅलीच्या दुसऱ्या बाजूला हालचाल दिसते. नीट निरखून पाहिल्यावर तिला असे दिसते की, साधारण शंभर एक उंटांचा काफिला एका रांगेत चढावरून चालत असतो. चपळ, बागडणारे मऊ लुसलुशीत बेबी उंट, त्यांच्या पावलावर चालत असतात. पाणवठ्याजवळ आल्यावर अतिशय विलक्षण, अविश्वसनीय घटना घडते. एकमेकांना ढकलत पुढे येऊन गर्दी करण्याऐवजी ते ५-५ च्या रांगेत पाणी पिण्यासाठी पुढे येतात. मागचे उंट आपली पाळी येईपर्यंत संयमाने व त्यांचा उंटपालक त्यांना खुणेने व आवाजाने बोलावेपर्यंत शांतपणे उभे राहतात. त्यांचा हा शिस्तबद्धपणा पाहून ती अतिशय आश्चर्यचकित होते. उंटांचा आज्ञाधारकपणा, एवढ्या मोठ्या बलवान प्राण्यांच्या मोठ्या कळपावर फक्त एका व्यक्तीचे नियंत्रण, त्यांच्या बछड्यांचे आलिंगन, बागडणे, वातावरणातील गूढता, पूर्वेकडील सुगंध या सर्वांने ती खूप भारावून जाते. तिच्यातील एक सुप्त आंतरिक शक्ती तिला उंटपालकाला भेटायला प्रोत्साहित करते. आपल्या तोडक्या मोडक्या अरब शब्द समूहाने ती उंटपालकाला सांगते की, त्याच्या कळपाने मंत्रमुग्ध झाली आहे.

त्या (bedouin) बदाउनी उंटपालकाचे नाव अबु जुमा असते व त्याच्या बायकोचे नाव उम जुमा असते. तो तिला आपल्या शेळीच्या केसाने बनवलेल्या तंबूत चहाचे आमंत्रण देतो.

ते तिला आग्रहाने अनेक ग्लासेस मींटचा चहा पाजतात. इल्स तिच्याशी व तिच्या फाटक्यातुटक्या

कपड्यांतील मुलांशी मैत्री करते. ते अतिशय आनंदी कुटुंब असते. ते इल्सशी हसून-खेळून गप्पा मारतात व विनोद करतात. त्यांची संपत्ती म्हणजे दोन फोमच्या गाद्या, काही स्वयंपाकाची साधने व तो तंबू. उंट हीच त्यांची खरी संपत्ती असते. एवढे उंट ते कशासाठी पाळतात ते तिला समजत नाही.

तिला जेव्हा जेव्हा वेळ मिळेल तेव्हा ती उत्खननाच्या जागेवरून निसटून येथे येते व त्यांच्यात मिसळते. तो वसंतऋतू होता. त्यामुळे कुरण डॅंडेलियॅानच्या फुलांनी फुललेले असते. मादी उंटांना त्यांची नाके गच्च हिरव्या चाऱ्यात खुपसतांना, त्यांच्या आवडत्या हिरव्या खाद्याने पोट भरताना पाहून तिला खूप समाधान आणि शांती मिळते. उंटांचे बछडे त्यांच्या खांबासारख्या पायांवर शिवाशिवी खेळताना, त्यांचा आजूबाजूचा प्रदेश न्याहाळताना व मधूनच त्यांच्या आईकडे संरक्षणासाठी धाव घेताना बघण्यात ती तासन्तास घालवू शकली असती.

अबु जुमा खऱ्या अर्थाने त्यांचा पालक असतो. तो हे पाहतो की, त्याचे उंट जास्तीत जास्त वेळ हंगामी हिरव्या कुरणांवर चरण्यांत घालवतात. तो दिवसभर त्यांच्याबरोबर राहतो. गाणी म्हणतो. त्या उंटांवर कसलीच सक्ती नसते.

माणूस व जनावर यांच्यातील सुंदर नाते ती बघते. पण लवकरच ते कुटुंब तेथून तंबू गुंडाळून निघून जाते. त्यानंतर उत्खननाचे काम संपल्यावर जॅार्डनच्या प्रवासातून तिला खूप उंट दिसत नाहीत. जणूकाही हे सर्व एक सुंदर काल्पनिक चित्र होते.

तिच्या देशांतील प्राण्यांना वाढविण्याची पद्धत व या पद्धतीत खूपच फरक तिला जाणवतो. जर्मनीत नुकत्याच जन्माला आलेल्या वासरांना लाकडी खोक्यांत ठेवले जात असे व आईपासून वेगळे करून दुधाच्या पावडरवर वाढवले जात असे.

तिला प्राण्यांची आवड असते. मुख्यतः घोड्यांची. पण तिचा भ्रमनिरास होतो. प्राण्याची किंमत त्यांच्या उपयुक्ततेवर ठरवली जात असे. पशुवैद्य म्हणून तिचे काम प्राण्यांच्या मदतीसाठी नसते; तर त्यांचे मालक जास्तीत जास्त फायदा कसा मिळवतील हे बघण्यासाठी असते. दोन वर्षांच्या तरुण घोड्यांना निर्दयपणे रेसकोर्सवर इतके पळवले जात असे की, त्यांची हाडे व स्नायू निकामी होत असत. मग कत्तलखाना हा एकच पर्याय राहत असे.

घरी परत गेल्यावर उंटांवर जेवढे म्हणून वाचता येईल तेवढे ती वाचते. अरेबियांत प्रवास केलेल्या प्रवाशांचे चित्तवेधक खंड ती वाचते. त्यांनी वर्णन केल्याप्रमाणे उंट हे बदाऊनी समुदायाच्या सर्व सामाजिक व भौतिक गरजा पुऱ्या करतात. म्हणूनच त्यांची संस्कृती उंटांना अल्लाची देणगी समजते. उंटांचा अरेबिक शब्द 'जमाल' (Jamal) म्हणजे 'सुंदर'.

तिला हे समजते की, फक्त बदाऊनी यांच्याच संस्कृतीचे उंटांशी भावनिक बंध नाहीत. उत्तर आफ्रिकेचे तुरेग (Tuareg) यांना उंट म्हणजे प्रेमाचे प्रतीक. ईथोपियांतील 'अफर' जमात उंटाचा मृत्यू, हा त्यांच्या मुलाच्या मृत्यूपेक्षा महत्त्वाचा समजतात, कारण उंटाशिवाय त्यांचे अस्तित्त्व राहणार नाही. केनियातील रेन्डिले व गाब्रा जमातीतील सर्व विधी उंटाभोवती असतात. उंटांशी अतिशय घट्ट (संबंध) बांधिलकी सोमालीच्या लोकांची आहे. त्यांचे विपुल साहित्य उंटांवर आहे.

अरेबियातील अनेक प्रसिद्ध संशोधक वाळवंटातील लोकांचा उंटाबद्दलचा स्नेह आणि त्यांची प्रवासवर्णने या प्रजातीच्या गुणांना अमर करतात. नशिबाने किंवा निवडीमुळे जगाच्या उष्ण आणि कोरड्या भागात राहण्यास भाग पाडलेल्या सर्व लोकांसाठी 'स्वर्गातून पाठवलेला प्राणी' म्हणून ते त्याचे वर्णन करतात.

---

स्वप्न पाहतच असाल तर मोठीच पाहा! लहान कशाला?
कारण मोठी स्वप्नेच माणसाच रक्त ढवळू शकतात!

खरं तर, उंटाशिवाय, बदाउनी वाळवंटात राहू शकत नाहीत व हे भाग उंटाशिवाय राहण्यास योग्य नाहीत. कारण उंट काटेरी, तंतुमय आणि खारट वनस्पतींच्या आहारावर पोसले जातात. उंट वाळवंटातील अन्यथा निरुपयोगी वनस्पतींचे अत्यंत पौष्टिक अन्न आणि उर्जेच्या इतर प्रकारांमध्ये रूपांतर करतात. अतिशय तुटपुंज्या व विखुरलेल्या संसाधनाने उंट मोठ्या प्रमाणात दूध हेच मुख्य अन्न व फक्त अन्न वर्षभर उत्पादन करण्यास सक्षम असतात. मांस, लोकर व शेण ही दुय्यम उत्पादने (by products) आहेत.

उंट हे एक परिपूर्ण यंत्र आहे जे वाळवंटाचा उपयोग करण्यासाठी बनवलेले आहे. ते अनेक प्रकारे पाण्याची बचत करण्याच्या यंत्रणांनी सुसज्ज आहे. उंटांचे शारीरिक तापमान कायम नसते. तर तो सरपटणाऱ्या प्राण्यांप्रमाणे किंवा थंड रक्ताच्या प्राण्यांप्रमाणे त्याच्या शरीराची उष्णता बाहेरील तापमानाशी जुळवून घेतो. उंटाच्या शरीराचे तापमान दिवसाच्या सर्वांत उष्ण वेळेस सर्वांत जास्त असते व सकाळच्या थंड वेळी सर्वांत कमी असते. ही एक पाणी वाचवायची चलाख कल्पना आहे. उंटाला फार कमी घाम येतो, त्यामुळेही पाण्याची बचत होते.

इल्स उंट व त्याचे पालन (domestication) यावर प्रबंध लिहिते. तिल बदाउनी व त्यांचे उंट यावर संशोधन करायला परवानगी मिळते, पण तिला सरकारी परमिट मिळत नाही. त्यांच्यामते आता उंट पाळणारे बदाउनी जास्त राहिले नाहीत व उंट कालबाह्य झाले आहेत. त्यामुळे तिला, तिच्या संशोधनातून बाहेर पडावे लागले व ती परत पुरातत्त्वप्राणी शास्त्रीय संशोधनाकडे वळते.

ती अमेरिकन पुरातत्त्व संशोधक गॅरी रोलेफ्सन याच्या प्रेमात पडते. लग्नानंतर तिला जोन व आयेशा ही दोन जुळी मुले होतात. ते सर्व सॅन दिएगो मध्ये जातात. तिथे गॅरी मानववंशशास्त्राचा प्राध्यापक होतो व ती विद्यार्थ्यांना पुरातत्त्वशास्त्र शिकवते.

प्रोफेसर बक्री मुसा व त्याचे सहकारी यांच्याबरोबर ती पूर्वेकडील वाळवंटात शेकडो मैल प्रवास करते. रशैदा बदाउनी यांची मुलाखत घेते. त्याच्या कळपाची रचना, चाऱ्याच्या वनस्पती, त्याच्या स्थलांतराचे मार्ग प्रजननाच्या पद्धती, आजारांवर पारंपरिक औषधे इ.ची माहिती करून घेते. रशैदा बदाउनी सुदानमध्ये शंभर वर्षांपूर्वी सौदी अरेबियातून आलेले असतात व वेगवेगळ्या प्रकारचे उंट विविध कारणांसाठी बाळगतात. त्यांचा स्वतःची, लालसर रंग लहान, बळकट आणि चांगले दूध देणारी जात असते. ज्यांची वंशावळ सात पिढ्यांमध्ये त्यांना माहीत आहे, अशा उंटांसाठी वेगवेगळ्या गल्फ देशांतून खूप श्रीमंत लोक येथे उंटांच्या शॉपींगसाठी विमानाने येत असत. तिचा इथला निवास कमी असतो; पण अतिशय फलदाई व आनंददायक असतो. तिला तेथे संशोधन करायचे असते पण परवानगी मिळत नाही.

सध्या ती राजस्थानमध्ये राहते आणि जगभरातील पशुपालक, प्राणी संस्कृती आणि शाश्वत पशुधन पाळण्याबद्दल संशोधन आणि लेखन करत आहे.

**– सौ. अल्पना बापट**
डॉ. बापट हॉस्पीटल
ठाणे
भ्रमणध्वनी – ९८३३०२९३५६



आपली खरी स्वप्न तीच आहेत; जी आपल्याला रात्री उशिरापर्यंत जगण्यास आणि सकाळी लवकर उठण्यास भाग पाडतात!

# परिसर वार्ता

**– संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

- **NCC Camp**

यशवंतराव चाफेकर कॉलेज, पालघर येथे दि. ०६ मे ते १५ मे २०२४ दरम्यान NCC कॅम्प आयोजित केला होता. या कॅम्पमध्ये आपल्या विद्यार्थ्यांनी नृत्य स्पर्धेत पारितोषिक म्हणून चषक प्राप्त केला. यात्रसंगी मार्गदर्शक शिक्षक श्री. संजय दिघे व श्री. अविनाश कोल्हे विद्यार्थ्यांसोबत होते.

- डॉ. बेडेकर विद्या मंदिर, (मा. वि.) मार्च २०२४ शालांत परीक्षेचा निकाल खालीलप्रमाणे :-

शाळेचा एकूण निकाल ९४.८८%

उत्तीर्ण विद्यार्थी १६७

| | | |
|---|---|---|
| ९०% च्या वर | विशेष श्रेणी | ०६ |
| ७५% ते ९०% पर्यत | विशेष श्रेणी | ५२ |
| ६०% ते ७४% पर्यत | प्रथम श्रेणी | ६८ |
| ४६% ते ५९% पर्यत | द्वितीय श्रेणी | ३४ |
| ३५% ते ४५% पर्यत | उत्तीर्ण श्रेणी | ०७ |

**गुणानुक्रमे पहिले दहा विद्यार्थी खालीलप्रमाणे:-**

| क्र. | विद्यार्थ्याचे नाव | एकूण गुण | टक्के |
|---|---|---|---|
| १ | ढोके दीपाली विकास | ४८१ | ९६.२०% |
| २ | तावडे गिरिज गणपत | ४६१ | ९२.२०% |
| | केरकर तन्मयी विजय | ४६१ | ९२.२०% |
| ३ | फाळके अवनी अनंत | ४६० | ९२.००% |
| ४ | मगर प्रियांका प्रवीण | ४५२ | ९०.४०% |
| ५ | ढेंबरे श्रेयश संदीप | ४५१ | ९०.२०% |
| ६ | फडतरे ऋतुजा शिवाजी | ४४९ | ८९.८०% |
| | भोसले मृण्मयी श्रीधर | ४४९ | ८९.८०% |
| | मेंगडे सोहम संतोष | ४४९ | ८९.८०% |
| ७ | रेवाळे ओमकार विनायक | ४४७ | ८९.४०% |
| | रेवडेकर मुग्धा एकनाथ | ४४७ | ८९.४०% |
| ८ | आढाव सार्थक मच्छिंद्र | ४४६ | ८९.२०% |
| | बांदल रोशनी सुरेश | ४४६ | ८९.२०% |
| | सकपाळ साहील मंगेश | ४४६ | ८९.२०% |
| ९ | फाटे मानस सुरेश | ४४३ | ८८.६०% |
| १० | साळुंके पियुष मनोज | ४४२ | ८८.४०% |

- **दि . २१ जून २०२४ – योग दिन**

महिला पतंजली योग समिती, मुंबई यांनी योग दिनाचे औचित्य साधून इ. ७ वीच्या विद्यार्थ्यांना योग दिनाचे महत्त्व समजावून सांगितले. योग समितीतील मुख्य योग शिक्षिका सौ मंगला कुंभार, तसेच सहयोगी शिक्षिका सौ. दीपाली शिंपी आणि इतर सहकारी सायली फडके, पद्मजा पाटील, अनिता पाटील, रोहिणी पाटील यांनी विद्यार्थ्यांकडून अतिशय शिस्तबद्ध रीत्या योगासनांचे प्रकार करून घेतले.

पर्यवेक्षिका सौ.सुषमा बोऱ्हाडे, सौ.दातार, श्री.देसले, श्री. कोल्हे, श्री. तळेले यांच्या उपस्थितीत इयत्ता ७वी च्या ६९ विद्यार्थ्यांनी अतिशय शिस्तबद्धरीत्या योगासने केली.

जिल्हा परिषद ठाणे, क्रीडा अधिकारी ठाणे, स्काऊट गाईड जिल्हा संस्था ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बेडेकर विद्या मंदिरातील स्काऊट गाईड विद्यार्थ्यांनी २१ जून हा 'आंतरराष्ट्रीय योग दिन' तालुका क्रीडा संकुल कोपरी, ठाणे येथे साजरा केला. यावेळी जिल्हा

अडचणीत असतांना अडचणीपासून दूर पळणे म्हणजे अजून मोठ्या अडचणीत जाण्यासारखेच आहे!

परिषद मधील विविध अधिकारी, तसेच शाळेतील गाईड कॅप्टन सौ.कल्पना बोरवणकर, श्री.संजय दिघे, तसेच शाळेतील २० स्काऊट्स २० गाईड्स उपस्थित होते.

- **संस्कृत गुंजनम व संस्कृत रंजनम**

'अखिल भारतीय शालिवाहन संस्कृत प्रतिष्ठान' तर्फे इयत्ता ५वी साठी संस्कृत गुञ्जनम आणि इयत्ता ७वी साठी संस्कृत रञ्जनम परीक्षा घेतली. या परीक्षेत इयत्ता ५वी तील ८ विद्यार्थ्यांना प्रथम श्रेणी, ३ विद्यार्थ्यांना द्वितीय श्रेणी आणि १६ विद्यार्थ्यांना उत्तीर्ण श्रेणी मिळाली. तर इ. ७वी तील १ विद्यार्थ्यास प्रथम श्रेणी आणि ६ विद्यार्थ्यांना द्वितीय श्रेणी मिळाली.

- **दि. २४ जून २०२४ – इ. ५वी प्रवेशोत्सव**

डॉ. बेडेकर विद्या मंदिर माध्यमिक विभागाच्या प्रांगणात प्राथमिक विभागातून आलेल्या इ. ५वी च्या विद्यार्थ्यांचे दि.२४ जून सोमवार रोजी ढोल ताशाच्या गजरात जंगी स्वागत करण्यात आले. शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे औक्षण केले. त्यांना गोड खाऊ देण्यात आला.

पर्यवेक्षिका सौ.बोऱ्हाडे बाईनी मुलांचे स्वागत केले, तर मुख्याध्यापिका वाघुले बाई यांनी आपल्या मनोगतातून 'शाळेची शिस्त, नियम व चांगली वर्तणूक कशी असावी?' या विषयी सांगितले.

- **शिक्षक अभिनंदन –**

आमच्या शाळेतील सौ. सुचिता शेलार आणि सौ. संगीता तातळे या शिक्षकांनी यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाची एम. ए. (एज्युकेशन) ही पदवी प्राप्त केली. ज्ञानगंगा एज्युकेशन ट्रस्ट ठाणे या केंद्रातून द्वितीय क्रमांक प्राप्त झाल्याबद्दल केंद्राकडून दोघींचाही विशेष गौरव करण्यात आला.

- **स्कॉलरशिप २०२४ निकाल –**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद मार्फत इ. ५वी व ८वीचा शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल जाहीर झाला. सदर परीक्षेत आपल्या शाळेतील खालील विद्यार्थी महाराष्ट्र शासनाच्या शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले.

१) अनय कमलेश पोतनीस – इ. ५वी
(ठाणे जिल्ह्यातून १४५ वा)

२) विधी भूषण गायकर – इ. ५वी
(ठाणे जिल्ह्यातून ३४० वी)

३) आर्या अभिजीत बाबर – इ. ८वी
(ठाणे जिल्ह्यातून २५८ वी)

- **गुरुपौर्णिमा**

शनिवार दि. २० जुलै रोजी इ. ६वी ८वी च्या गुरुपौर्णिमेच्या कार्यक्रमासाठी संगीत विशारद, होमियोपॅथी डॉ. सौ. अश्विनी बापट उपस्थित होत्या. त्यांनी छोट्या छोट्या गोष्टींच्या माध्यमातून निसर्गापासून राष्ट्रापर्यंत प्रत्येक गुरूचे महत्त्व सोप्या सुलभ भाषेत विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

दि. २२ जुलै रोजी इ. ५वी व ७वी च्या विद्यार्थ्यांसाठी बेडेकर महाविद्यालयाच्या मराठी विषय प्राध्यापिका सौ. प्रज्ञा पंडित उपस्थित होत्या. त्यांनी विविध गोष्टींच्या माध्यमातून गुरूमहिमा स्पष्ट केला. तर इ. १०वी च्या विद्यार्थ्यांसाठी आपल्याच शाळेच्या माजी संस्कृत शिक्षिका सौ. मीरा लिमये प्रमुख अतिथी म्हणून लाभल्या. त्यानी विद्यार्थ्यांना गीतेचे महत्त्व, जीवनातील आई–वडिलांचे महत्त्व समजावून सांगितले. सर्वांच्या सहकार्यातून कार्यक्रम उत्तमरीत्या पार पडले.

- **वृक्ष लागवड वृक्ष दिंडी**

दि. ४ जुलै रोजी मुख्यमंत्री 'हरित ठाणे अभियान' अंतर्गत डॉ. बेडेकर विद्या मंदिर (मा. वि.) येथे वृक्ष लागवड आणि वृक्ष दिंडीचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमासाठी ठाणे महानगरपालिकेतर्फे झाडांची रोपे उपलब्ध करून दिली गेली. शाळेच्या मुख्याध्यापिका

थोडे दुःख सहन करून दुसऱ्याला सुख मिळत असेल!
तर आपण थोडे दुःख सहन करायला काय हरकत आहे!

कल्पना वाघुले यांच्या मार्गदर्शनाखाली आणि ठाणे जिल्हा गाईड संघटक सौ. हेमांगी पाटील यांच्या हस्ते इ. ७वी आणि इ. ८वी च्या स्काऊट गाईडच्या उपस्थितीत वृक्षारोपण करण्यात आले. यानंतर विद्यार्थ्यांनी शाळेच्या परिसरात वृक्ष संदर्भात विविध घोषणा फलकासहित वृक्षदिंडीचे आयोजन केले. या प्रसंगी गाईड कॅप्टन सौ. कल्पना बोरवणकर स्काउट मास्टर श्री. संजय तळेले, श्री. जीवन जाधव, सौ. सुषमा बोऱ्हाडे उपस्थित होते.

- **व्यवहार ज्ञान – एक शालेय उपक्रम**

विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष व्यवहार ज्ञान मिळावे यासाठी इयत्ता ९वी अ मधील विद्यार्थ्यांना घेऊन सौ. धनगर व श्री. शिरापुरी या शिक्षकांनी प्रत्यक्ष भाजीपाला मार्केटला भेट दिली.

- **१ ऑगस्ट लोकमान्य टिळक पुण्यतिथी**

लोकमान्य टिळक पुण्यतिथी निमित्त ब्राह्मण सभा तर्फे आयोजित वक्तृत्व स्पर्धेत इ. ८वी ते १०वी च्या गटात जुईली ठाणेकर (८वी अ) हिला द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले.

लोकमान्य टिळक पुण्यतिथी निमित्त शाळेतील विद्यार्थ्यांसाठी हस्ताक्षर व वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. विजेत्या विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रक देऊन त्यांचे कौतुक करण्यात आले.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी पूर्व प्राथमिक विभाग

- १५ जून २०२४ – पूर्व प्राथमिक विभागात म्हणजे नर्सरी, ज्यूनियर व सिनीयर प्रवेश घेतलेल्या पालकांकरता शाळेच्या या वर्षी, 'गार्गी सभागृहात' परिचयात्मक सभा (Orientation Programme) घेण्यात आली. सर्व उपस्थितांना विभाग प्रमुख सौ. अपर्णा वरुडकर यांनी विद्या प्रसारक मंडळ व त्याच्या विविध संस्थांची ओळख करून दिली. सौ. ए. के. जोशी विद्यालयाच्या चढत्या यशाचा आलेख, शाळेचे विविध उपक्रम याची सचित्र माहिती करून देण्यात आली.

शाळेच्या डीन सौ. कालिंदी कोल्हटकर, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका डॉ. सौ. अस्मिता मोहीले, पर्यवेक्षक प्रियांका भांगले, तसेच प्राथमिक विभागांच्या मुख्याध्यापिका सौ. अंजना कपूर यांचा परिचय सौ. वरुडकर यांनी पालकांना करून दिला.

डीन मॅडमच्या अमूल्य मार्गदर्शनाने व सर्व मेहनती शिक्षकांच्या सहकार्याने यावर्षी शाळेला 'सर्वोत्कृष्ट शाळा' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

- १८ जून २०२४ – पूर्व प्राथमिक विभागाचा शाळेचा पहिला दिवस. मुलांच्या थोड्या रडण्यात – खेळण्यात हा दिवस पार पडला. सर्व नवीन वातावरणाशी जुळवून घेण्यासाठी मुलांना काही दिवस लागतात.
- ६ जुलै २०२४ – नर्सरी ज्यूनियर व सिनीयर पालकांची यावर्षीची पहिली पालक सभा घेण्यात आली. शाळेचा अभ्यासक्रम, शाळेचा दिनक्रम, वर्षभरातील विविध उपक्रम याबद्दल पालकांना, शिक्षकांना सविस्तर माहिती दिली.

प्रत्येक गटातून एक – याप्रमाणे पालक प्रतिनिधींची (PTA Members) नियुक्ती केली गेली.

- १६ जुलै २०२४ – शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यावर येणारा पहिला सण उत्सव म्हणजे आषाढी एकादशी. सर्व मुलांनी पारंपरिक वेशभूषा परिधान केली होती. आषाढी, पंढरपूरचे विठ्ठल मंदिर, वारकरी या सर्वांची माहिती दृक् – श्राव्य माध्यमातून मुलांना दिली गेली.

विठ्ठल – रुक्मिणी मूर्तीची पूजा करून छोटीशी पालखी घेऊन विठूरायाच्या गजरात दिंडी काढण्यात आली. सिनीयरच्या मुलांना 'झाडे वाचवा – झाडे लावा' या विषयाअंतर्गत छोट्या करवंटीत छोटी रोपटी लावण्यास सांगितली होती.

सिनीयरच्या मुलांनी विठ्ठलाची गाणी म्हटली.

आरोही देव - वृक्ष तोडीचे दुष्परिणाम.

मन्वी वझे - ३ औषधी झाडांची माहिती.

अथर्व म्हात्रे - झाडे वाचवा.

या विषयावर सर्व मुलांना माहिती सांगितली. राजगिरा चिक्कीचा प्रसाद सर्वांना देण्यात आला.

- २१ जुलै २०२४ रोजी येणाऱ्या गुरुपौर्णिमेची माहिती शुक्रवार १९ जुलै २०२४ रोजी शिक्षकांनी दिली. आई आपला पहिला गुरू, तसेच वडील घरातील सर्व मोठ्या माणसांचा आदर करणे. शाळेत, शिक्षकांचा आदर करणे याबद्दल शिक्षकांनी मुलांना सांगितले. पौर्णिमा म्हणजे पूर्ण चंद्र याबद्दल थोडक्यात माहिती दिली.

- **शाळेत वर्षभर घेण्यात येणारे उपक्रम :-**

मुलांना स्वावलंबी बनवण्याचा दृष्टीने त्यांच्या ज्ञानात भर पडण्यासाठी अनेक उपक्रम वर्षभर घेतले जातात. ज्याच मुलांचा सर्वांगीण विकासात मोलाचा हातभार असतो. पुढील उपक्रम प्रत्येक आठवड्यात एकदा असे घेण्यात येतात.

अभ्यासक्रमातील काही विषय व त्यावरील माहिती देण्यासाठी सर्व शिक्षक चित्रपट प्रक्षेपण यंत्राचा (Projector) लॅपटॉपच्या सहाय्याने प्रभावी उपयोग करतात.

वाचनालयातील तासिका - वाचनाची गोडी लागण्यासाठी दर आठवड्याला वाचनालयात सर्व मुलांना घेऊन जाण्यात येते. ज्यूनियरची मुले विविध पुस्तकांतील चित्र बघतात, सिनियरची मुले शिक्षकांच्या मदतीने छोटी गोष्टींची पुस्तके वाचतात.

प्रत्येक आठवड्यातील शुक्रवारी ज्यूनियरच्या मुलांना एक कार्यपत्रिका (worksheet) घरी सोडवण्यासाठी दिली जाते. सिनियरच्या मुलांना इंग्रजी, गणित व प्रोजेक्ट विषयावरची कार्यपत्रिका शाळेत सोडवण्यासाठी दिली जाते.

**बनी टमटोला -**

पूर्व प्राथमिक विभागात घेतल्या जाणाऱ्या स्काऊट विभागाच्या उपक्रमांना 'बनी टमटोला' म्हणून संबोधले जाते. दर बुधवारी बनीची प्रार्थना म्हटली जाते. बनीचा ॲप्रन मुले घालून येतात.

या अंतर्गत सणांचे महत्त्व, चांगल्या सवयी, बागकाम, विविध कलाकृती असे अनेक उपक्रम वर्षभरात घेतले जाणार आहेत.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी प्राथर्फमिक विभाग

### आषाढी एकादशी उत्सव

प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी १६ जुलै २०२४ रोजी आषाढी एकादशी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला. उत्सवाची सुरुवात प्रभात फेरीने झाली, जिथे विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषा करून विठ्ठल-रुक्मिणीची पालखी सजवली आणि 'हरी मुखे म्हणा, हरी मुखे म्हणा' या गजरात दिंडी शाळेत फिरविली. फेरी दरम्यान, विद्यार्थी हातात फलक घेऊन आरोग्यदायी जीवनशैलीचे महत्त्व पटवून देत होते.









'विजेते' वेगळ्या गोष्टी करत नाहीत ते प्रत्येक गोष्ट वेगळेपणाने करतात!

कार्यक्रमात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल होती. विद्यार्थ्यांनी नृत्य, गाणी, नाटिका यांद्वारे आरोग्यदायी अन्नाचे फायदे आणि जंक फूडच्या तोट्यांवर प्रकाश टाकला. एका नाटकाच्या माध्यमातून त्यांनी जंक फूड आरोग्याला कसे अपायकारक आहे आणि ताजी फळे, भाज्या आणि पोषक आहार कसा आरोग्यदायी आहे हे दाखवले. यावेळी वर्ग चौथीच्या विद्यार्थ्यांनी, 'आरोग्यदायी खा, निरोगी रहा आणि जंक फूडला नाही म्हणा' या विषयावर आधारित भारूड सादर केले. संपूर्ण कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला आणि विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करण्यात आली. विद्यार्थ्यांना दररोज ताजे आणि पोषक आहार घेण्याचे आणि जंक फूडपासून दूर राहण्याचे आवाहन केले. शाळेतील शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आणि त्यांना आरोग्यदायी आहाराचे महत्त्व समजावून सांगत सर्वांना शाबासकी दिली.

**नागपंचमी –**

नागपंचमीच्या निमित्ताने सौ. ए. के. जोशी इंग्लिश मीडियम शाळेतील प्राथमिक विभागाच्या इयत्ता १ली ते ४ थीच्या विद्यार्थ्यांनी विविध कार्यक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला.

शाळेच्या परिपाठाच्या वेळी विद्यार्थ्यांना प्रत्येक सणाचे महत्त्व सांगण्यात आले.

**नागपंचमी :** विद्यार्थ्यांनी नागपंचमीच्या दिवशी नागदेवतेच्या चित्रांना रंगविणे आणि सांस्कृतिक कार्यक्रमात श्रावणातील "**श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहिकडे व हसरा नाचरा जरासा लाजरा सुंदर साजिरा श्रावण आला**" ही गाणी सादर केली. त्यांनी नागदेवतेच्या महत्त्वाविषयीही, निसर्ग व सर्पांच्या संरक्षणाचे महत्त्व समजावून सांगितले.





**सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विभाग**

**Pre Upper Primary Scholarship Examination Std 5th (PUP) FINAL RESULT - 2024**

| Sr. No. | Student Name | % | Merit Set Code |
|---|---|---|---|
| १ | आनंद निरंजन वैशंपायन | ८२.३१ | शहरी सर्वसाधारण (K-१२/४९५) |
| २ | हेत्वी राकेश गुणीजन | ७८.२३ | शहरी सर्वसाधारण (K-३३/४९५) |
| ३ | अर्जुन अमोल मोडक | ७६.१९ | शहरी सर्वसाधारण (K-५८/४९५) |
| ४ | चिन्मय विनय देशपांडे | ७४.१९ | शहरी सर्वसाधारण (K-७४/४९५) |
| ५ | आर्य अभिजीत दाते | ७४.८२ | शहरी सर्वसाधारण (K-८२/४९५) |
| ६ | श्लोक राहुल सरोदे | ७२.१० | शहरी सर्वसाधारण (K-१११/४९५) |
| ७ | क्रिशा कुंदन पवार | ७२.१० | शहरी सर्वसाधारण (K-१०९/४९५) |
| ८ | देवेश सिद्दार्थ नागवेकर | ७२.१० | शहरी सर्वसाधारण (K-१०६/४९५) |
| ९ | आरव अमित भडकमकर | ६८.७० | शहरी सर्वसाधारण (K-१८३/४९५) |

खूप माणसांची स्वप्नेही या एका विचारामुळे अपूर्ण राहतात; 'तो म्हणजे' लोक काय म्हणतील?

| | | | |
|---|---|---|---|
| १० | अर्णव नीतिन दांडेकर | ६८.७० | शहरी सर्वसाधारण (K-१८४/४९५) |
| ११ | मोहित समीर शिंदे | ६६.६६ | शहरी सर्वसाधारण (K-२४६/४९५) |
| १२ | नील राजेश जोशी | ६५.९८ | शहरी सर्वसाधारण (K-२६६/४९५) |
| १३ | विहान अमोल जोगळेकर | ६३.२६ | शहरी सर्वसाधारण (K-३८५/४९५) |
| १४ | मीरा समीर बहाद्दरपुरकर | ६१.९० | शहरी सर्वसाधारण (K-४५८/४९५) |

**Pre Upper Primary Scholarship Examination**
**Std 5th (PUP) FINAL RESULT - 2024**

| Sr. No. | Student Name | % | Merit Set Code |
|---|---|---|---|
| १ | अवनी रवींद्र पेंडसे | ७७.८५ | शहरी सर्वसाधारण (K-९/४०५) |
| २ | आरुष नीतिन दांडेकर | ७२.४८ | शहरी सर्वसाधारण (K-२५/४०५) |
| ३ | अंजली प्रवीण साठे | ७२.४८ | शहरी सर्वसाधारण (K-२४/४०५) |
| ४ | सोहम सुयोग पेणकर | ७१.१४ | शहरी सर्वसाधारण (K-३०/४०५) |
| ५ | अर्णव सुयोग करुळकर | ७१.१४ | शहरी सर्वसाधारण (K-२९/४०५) |
| ६ | अर्णव शलाका अधिकारी | ६९.७९ | शहरी सर्वसाधारण (K-३५/४०५) |
| ७ | अवनिश गजानन पोटे | ६८. ४५ | शहरी सर्वसाधारण (K-३९/४०५) |
| ८ | आरव अभिजीत दामले | ६६.४४ | शहरी सर्वसाधारण (K-५३/४०५) |
| ९ | वेद गिरीश घाग | ६६.४४ | शहरी सर्वसाधारण (K-४९/४०५) |
| १० | सम्यक पराग धामणस्कर | ५९.०६ | शहरी सर्वसाधारण (K-१८०/४०५) |
| ११ | सौम्या परिमल देशपांडे | ५९.०६ | शहरी सर्वसाधारण (K-१७८/४०५) |
| १२ | सुरभी संतोष फडके | ५९.०६ | शहरी सर्वसाधारण (K-१७५/४०५) |
| १३ | सिया नीतिन सावंत | ५८.३८ | शहरी सर्वसाधारण (K-२००/४०५) |
| १४ | शर्मद प्रसाद करडे | ५८.३८ | शहरी सर्वसाधारण (K-२०२/४०५) |
| १५ | आर्या आशीष मेहेंदळे | ५८.३८ | शहरी सर्वसाधारण (K-१९१/४०५) |
| १६ | हर्षिक अमूल तांबडे | ५७.०४ | शहरी सर्वसाधारण (K-२५०/४०५) |
| १७ | भार्गव अवधूत कोळी | ५४.३६ | शहरी सर्वसाधारण (K-३८९/४०५) |
| १८ | सृष्टी नीतिन कोठवडे | ५४.३६ | शहरी सर्वसाधारण (K-३७६/४०५) |
| १९ | रुद्र सोमनाथ रेलेकर | ५३.६९ | शहरी सर्वसाधारण (K-४०५/४०५) |

**संस्कृत स्कॉलरशिपचा निकाल**

| अनु.क्र. | विद्यार्थ्यांची नावे | गुण |
|---|---|---|
| १ | कुमारी स्रग्वी बर्वे | ८८ |
| २ | कुमार अर्णव करुळकर | ८६ |
| ३ | कुमारी सानिका सहस्रबुद्धे | ८२ |
| ४ | कुमारी मनस्वी पालव | ५२ |

अन्याय करणे हे पाप आणि होणारा अन्याय सहन करणे किंवा उघड्या डोळ्यांनी पाहणे हे महापाप!..

## बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त)

दिनांक २३.०७.२०२४ रोजी लोकमान्य टिळक जयंती महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागामध्ये साजरी करण्यात आली. ग्रंथपाल सौ.कादंबरी मांजरेकर यांनी लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. तसेच लोकमान्य टिळक यांच्यावरील माहितीचे पुस्तक प्रदर्शन करण्यात आले होते.



दिनांक ०१.०८.२०२४ रोजी लोकमान्य टिळक पुण्यतिथी, अण्णाभाऊ साठे जयंती, तसेच विद्या प्रसारक मंडळ वर्धापन दिवस महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागामध्ये साजरा करण्यात आला. ग्रंथपाल सौ.कादंबरी मांजरेकर यांनी लोकमान्य टिळक, अण्णा भाऊ साठे, तसेच डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. यांच्यावरील माहितीचे तसेच पुस्तक प्रदर्शन करण्यात आले होते.




दिनांक ०३.०८.२०२४ रोजी क्रांतिसिंह नाना पाटील जयंती महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागामध्ये साजरी करण्यात आली. ग्रंथपाल सौ.कादंबरी मांजरेकर यांनी क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. तसेच क्रांतिसिंह नाना पाटील यांच्यावरील माहितीचे प्रदर्शन करण्यात आले होते.



**'Cyber Warriors'**

माहिती तंत्रज्ञान, संगणक शास्त्र, डाटा सायन्स आणि Quickheal Foundation यांच्या संयुक्त विद्यमाने १५ जुलै २०२४ रोजी 'Cyber Warriors' या विषयावर उद्‌बोधनपर सत्र संपन्न झाले. विभाग प्रमुख प्रा.अभिजित काळे आणि सहाय्यक प्रा.तेजस जाधव यांनी 'सायबर हमला' या विषयावर विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता आणली. ३० विद्यार्थी या सत्राला उपस्थित होते.



**'Cyber Security'**

माहिती तंत्रज्ञान, संगणक शास्त्र, डाटा सायन्स आणि Quickheal Foundation यांच्या संयुक्त विद्यमाने पोलिस इन्स्पेक्टर सायबर विभाग ठाणे श्री.वाकरे सर यांचे 'Cyber Security' या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. सायबर सुरक्षेबाबत खेळीमेळीच्या वातावरणात विविध दाखले देऊन त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

टीका करणाऱ्या शत्रुंपेक्षा दिखावू स्तुती करणाऱ्या मित्रांपासून सावध रहा!



**FUTECH24 :**



माहिती तंत्रज्ञान, संगणक शास्त्र, डाटा सायन्स आणि Quick heal Foundation यांच्या संयुक्त विद्यमाने 'Futech २४' या विषयावर दि. २० जुलै २०२४ रोजी राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. पहिल्या सत्रामध्ये डॉ.नीतिन काळे, सहसंस्थापक नॅनोस्निक टेक्नॉलॉजी, मुंबई यांनी मायक्रो इलेक्ट्रो मेकॅनिकल सिस्टीम टेक्नोलॉजी याबद्दल माहिती सांगितली. दुसऱ्या सत्रात IOT ची रियल इस्टेट मार्केट मधील भूमिका याबद्दल श्री.योगेश बोऱ्हाडे तांत्रिक कार्यक्रम अधिकारी, फ्रोस्पेस यांनी विचार मांडले. तिसऱ्या सत्रात कु.ग्रेट अल्मेडा, असिस्टंट वाईस प्रेसिडेंट, बँक ऑफ अमेरिका यांनी बिजिनेस इंटेलिजन्स, त्याचे आर्किटेक्चर, टूल्स, फायदे व तोटे याबद्दल चर्चा केली. चौथ्या सत्रात Low Code, No Code प्लॅटफॉर्म याबद्दल श्री.अँथोनी डिसुझा, टेक्निकल आर्किटेक्ट यांनी चर्चा केली. पाचव्या सत्रात श्री.योगेश वाळंजकर, संचालक, डी.एस.एस.बँक यांनी Data Security Beyond Encryption, Vault software याची ओळख करून दिली. या परिसंवादाला १५० विद्यार्थी व ९ शिक्षक उपस्थित होते.

**व्याख्यानमाला संपन्न :-**

डॉ.वा.ना. बेडेकर व्याख्यानमालेअंतर्गत २४ जून २०२४ रोजी Professional Ethics: Do's and Don't's या विषयावर डॉ.अश्विन कोटनिस, प्राध्यापक, जैवरसायनशास्त्र, AIIMS भोपाळ यांचे व्याख्यान संपन्न झाले. डॉ.अश्विन यांनी वाङ्मय चौर्याबद्दल 'केस स्टडी'च्या माध्यमातून चर्चा केली. या व्याख्यानाला ७५ विद्यार्थी व ७ शिक्षक उपस्थित होते.



## विद्या प्रसारक मंडळाचे
## ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

**एल एल एम आणि नवीन अतिरिक्त तुकडी**

महाविद्यालयाला मुंबई विद्यापीठातून एल. एल. एम. (६० जागा) आणि नवीन अतिरिक्त तुकडी (एल. एल.बी.) साठी ६० जागांची मान्यता प्राप्त झाली आहे. तसेच विद्यापीठ संलग्नता पत्र महाविद्यालयास प्राप्त झाले.

**२०२४-२०२५ च्या पहिल्या सत्रातील वर्गांची सुरुवात**

महाविद्यालयाचे द्वितीय वर्ष विधी आणि तृतीय वर्ष विधी वर्ग १५ जुलै पासून सुरू करण्यात आले.

**निकाल :–** सत्र ४ – एल.एल.बी. चा निकाल ४ एप्रिल रोजी जाहीर झाला.

सत्र ५ – एल.एल.बी. चा निकाल २० एप्रिल रोजी जाहीर झाला

**नवीन नियुक्ती :–** महाविद्यालयातील रिक्त असलेल्या सहाय्यक प्राध्यापकांच्या जागांकरिता दिनांक १२ जुलै २०२४ रोजी मुलाखती घेण्यात आल्या. निवड झालेल्या ६ जणांनी रुजू होण्याचे मान्य केले आहे. त्यापैकी ५ सहाय्यक प्राध्यापक येत्या १ ऑगस्ट पासून कामावर हजर होणार आहेत. त्यांची नावे खालील प्रमाणे कु. प्रेरणा वसावे, श्रीमती रुपाली जामोडे, श्रीमती चांदणी घोगरे, श्री. शिवाजी बिबे आणि श्री. यतीन पंडित.

**ॲड ऑन प्रमाणपत्र अभ्यासक्रम (Certificate Programme) : आपत्ती व्यवस्थापन कायदा –**

आपत्ती व्यवस्थापन कायदा ह्या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची सुरुवात १६ फेब्रुवारी २०२४, शुक्रवार पासून सुरू झाले. अभ्यासक्रम समन्वयक म्हणून प्रो. कृष्णा कामत ह्यांची नेमणुक केली होती. व्याख्यान महाविद्यालयात दर शनिवारी सायंकाळी ७.०० ते ८.३० या वेळेत होते. १५ जून रोजी परीक्षा घेण्यात आली आणि विद्यार्थ्यांना वर्ग चाचण्यांसह प्रकल्प सादर करण्यास सांगण्यात आले. ह्या निकाल १९ जुलै, २०२४ रोजी घोषित करण्यात आला. सदर कोर्स मध्ये ३४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. तसेच ते यशस्वीरित्या उत्तीर्ण झाले.

**आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा :–**

महाविद्यालयात नवीन गुन्हेगारी कायद्यांवरील आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा दिनांक २४ जुलै रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर स्पर्धेत १३ विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. स्पर्धा इंग्रजी व मराठी दोन्ही माध्यमांतून घेण्यात आली. स्पर्धेचे विजेते पुढील प्रमाणे:–

**इंग्रजी माध्यम –**

प्रथम क्रमांक : विवेकानंद विधी महाविद्यालय
द्वितीय क्रमांक : लाला लजपतराय विधी महाविद्यालय
तृतीय क्रमांक : जीवनदीप विधी महाविद्यालय

**मराठी माध्यम –**

प्रथम क्रमांक: सिद्धा योग विधी महाविद्यालय
द्वितीय क्रमांक: सुभाष देसाई विधी महाविद्यालय
तृतीय क्रमांक: विद्या प्रसारक मंडळाचे ठा.म.पा. विधी महाविद्यालय

**वक्तृत्व स्पर्धेचे विषय :–**

१. महिलांवरील गुन्हे : भारतीय दंड संहिता विरुद्ध भारतीय न्याय संहिता
२. पोलिसांचे अधिकार: फौजदारी प्रक्रिया संहिताविरुद्ध भारतीय नागरिक सुरक्षा संहिता
३. इलेक्ट्रॉनिक पुरावा : भारतीय पुरावा कायदा विरुद्ध भारतीय सुरक्षा अधिनियम

सदर स्पर्धेत न्यायाधीश म्हणून ज्येष्ठ ॲड. सुनीता कापरेकर आणि प्रा. कृष्णा शेट्टी (सहाय्यक परीक्षा नियंत्रक सोमय्या विद्यापीठ) ह्यांनी काम पाहिले.

आमचे विद्यार्थी श्री. श्रीराम गुप्ते आणि तेजल सावंत ह्यांनी सदर स्पर्धेत पारितोषिक पटकाविले.






### राष्ट्रीय परिषदेची घोषणा

महाविद्यालयातर्फे २२ फेब्रुवारी २०२५ रोजी भरवण्यात येणाऱ्या राष्ट्रीय परिषदेची महाविद्यालयातर्फे घोषणा करण्यात आली सदर परिषदेचा विषय 'औषध आणि कायदा द कनेक्ट आणि द इंटरप्ले' असा असेल. परिषद महाविद्यालयाच्या प्रांगणात असलेले थोरले बाजीराव पेशवे सभागृह येथे सकाळी १०.३० ते सायंकाळी ६.३० या वेळेत भरविण्यात येईल.

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

विद्या प्रसारक मंडळाच्या पदविका संस्थेचे पदवी महाविद्यालयात रूपांतरण शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून होत आहे. ह्या निमित्ताने विद्या प्रसारक मंडळाने थोरले बाजीराव पेशवे सभागृहात दिनांक २७ जुलै २०२४ रोजी सायंकाळी पाच ते आठच्या दरम्यान कार्यक्रम आयोजित केला होता.

ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉक्टर अनिल काकोडकर हे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या उद्घाटन सोहळ्या प्रसंगी विद्या प्रसारक मंडळाचे मान्यवर सदस्य, विविध संस्थांचे प्राचार्य, प्रमुख शिक्षणतज्ज्ञ, उद्योजक पालक, माजी विद्यार्थी इ. उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉक्टर कीर्ती आगाशे यांनी ओघवत्या भाषेत केले.

मान्यवरांच्या हस्ते द्वीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली स्वागत गीत सौ. ऋचा आगाशे-उतेकर यांनी सादर केले.

प्रमुख पाहुणे डॉक्टर अनिल काकोडकर यांच्या हस्ते अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळाचे उद्घाटन व पॉलिटेक्निकच्या वार्षिक मासिक Innovision चे प्रकाशन करण्यात आले.

माजी विद्यार्थी श्री राजेश सोळंकी उद्योगपती यांनी त्यांच्या पदविका संस्थेची निगडित आठवणी आणि अनुभव ह्याचे कथन केले. इंजिनीअरिंग कॉलेजच्या भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

पालक श्री. झिंगरे यांनी आपल्या मुलाच्या करिअरला योग्य दिशा दिल्याबद्दल पॉलिटेक्निकचे आभार मानले.

प्राचार्य डॉक्टर दिलीप कुमार नायक यांनी पदविका ते पदवी कॉलेजचा प्रवास दृकश्राव्य माध्यमातून सादर केला. त्यांच्या भाषणात त्यांनी पॉलिटेक्निकचा चढता आलेख मांडला त्यामध्ये त्यांनी मिलेनियम आयटी प्रदर्शन एन बी ए द्वारे मिळालेले मानांकन घेतलेल्या २८ राष्ट्रीय परिषदा पॉलिटेक्निक ला उत्कृष्ट पॉलिटेक्निक म्हणून मिळालेला पुरस्कार तसेच MODROBS चे मिळालेले अनुदान ISTE चा मिळालेला पुरस्कार या अनेक उल्लेखनीय उपलब्धी नमूद केल्या.




डॉ. महेश बेडेकर विद्या प्रसारक मंडळाचे सदस्य यांनी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या उभारणीसाठी घेतलेल्या सर्वांचे कौतुक केले, तसेच डॉ. अनिल काकोडकर यांचे आचार आणि विचार प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले. ज्येष्ठ सदस्य श्रीयुत जयंत कयाळ यांनी सर्व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन व कौतुक केले आणि शुभेच्छा दिल्या. विद्या प्रसारक मंडळाच्या महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नरेंद्र सोनी यांनीही याप्रसंगी शुभेच्छा दिल्या.




प्रमुख पाहुणे पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर यांनी आपल्या भाषणात नवीन शैक्षणिक धोरण आणि इंजिनीअरिंगचे शिक्षण याची सांगड कशी घालावी हे श्रीनगर येथील एका विद्यापीठातील 'डिझाईन युवर ओन डिग्री कोर्स' या स्तुत्य उपक्रमाचे उदाहरण देऊन सांगितले.

शिक्षण हे समग्र असले पाहिजे, तसेच ज्ञानाच्या पावित्र्य राखण्याचे आवाहन उपस्थितांना केले. कुठलेही संशोधन हे सिद्धांतावर नाही तर वारंवार केलेल्या प्रयोगांमधून सिद्ध होते हे सांगताना बी.ए.आर.सी. मधील अनुभवांचे कथन केले.

विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी आपल्या भाषणात विद्या प्रसारक मंडळ गुणवत्तेसाठी नेहमीच वचनबद्ध आहे, त्याचप्रमाणे इंजिनिअरिंग कॉलेजमधून शिक्षण घेतलेला विद्यार्थी गुणवत्ते बरोबरच सुजाण नागरिक असेल याची त्यांनी ग्वाही दिली.



कार्यक्रमाची सांगता सूत्रसंचालकाने आभार प्रदर्शन व पसायदानाने केली या कार्यक्रमानंतर मंडळाचे सदस्य श्रीयुत अनिरुद्ध जोशी व स्वर मंचाच्या साथीदारांनी संगीताचा कार्यक्रम आयोजित केला. डॉ. बेडेकर विद्या मंदिराच्या शिक्षिका सौ साधना जोशी यांनी आपल्या खुमासदार शैलीत या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. सर्व रसिक श्रोत्यांनी या कार्यक्रमाचा मनमुराद आनंद घेतला व नंतर आयोजित केलेल्या सहभोजनाचा आस्वाद घेतला.



## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे




६ जुलै : डॉ. व्ही. एन. ब्रिम्सच्या व्यावसायीक सामाजिक जबाबदारी (CSR) समितीने ६ जुलै २०२४ रोजी 'हरियाली' या स्वयंसेवी संस्थेच्या सहकार्याने वृक्षारोपण उपक्रम राबविला.

१८ जुलै : डॉ. व्ही. एन. ब्रिम्स ग्रंथालयाच्या वतीने, ग्रंथपाल श्री. संजय सपकाळ यांनी १८ जुलै २०२४ रोजी ब्रिम्सच्या प्राध्यापक सदस्यांसाठी टर्निटिनचा प्रभावी वापर या विषयावर एका सत्राचे आयोजन केले. शैक्षणिक लेखन आणि टर्निटिन सॉफ्टवेअर तज्ज्ञ, श्री. मोहनीश भडांगे यांनी हे सत्र घेतले. यामध्ये टर्निटिनच्या प्रभावी वापरासाठी प्रशिक्षण, विशेषत: साहित्यिक चोरी शोधणे, समान अहवालांचा अर्थ लावणे

आणि टर्निटिन सॉफ्टवेअर प्लॅटफॉर्ममध्ये उपलब्ध असलेल्या विविध साधनांचा वापर करणे यावर महत्त्वपूर्ण माहिती देण्यात आली. टर्निटिन सॉफ्टवेअर संदर्भात समज वाढवणे आणि शैक्षणिक आणि व्यावसायिक कामकाजामध्ये टर्निटिनचा सातत्यपूर्ण वापर सुनिश्चित करणे या उद्देशाने या सत्राचे आयोजन करण्यात आले होते.





२० जुलै : डॉ. नीतिन जोशी यांना विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज चेंबूरच्या संचालकांच्या नियुक्ती साठी विद्यापीठातर्फे कुलगुरू नामांकित निवडसमिती सदस्य व विषय तज्ज्ञ म्हणून आमंत्रित करण्यात आले.




२० जुलै : डॉ. व्ही.एन.ब्रिम्सच्या व्यावसायीक सामाजिक जबाबदारी (CSR) समितीने २० जुलै २०२४ रोजी हरियाली (रबाळे) येथे इकोट्रेल उपक्रम राबविला.

## महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर

दि. १० जुलै २०२४ रोजी महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागातर्फे 'महाकवी कालिदास दिन' साजरा करण्यात आला. आषाढस्य प्रथम दिवसे म्हटल्यावर डोळ्यांसमोर नाव येतं ते महाकवी कालिदास यांचं. आषाढ महिन्यातील शुद्ध प्रतिपदा हा दिवस कालिदास दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्त परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाने हा दिन अभिनव पद्धतीने साजरा केला. 'शाकुंतल' नाटकातील पंचतुंडनररुंडमालधर या नांदीने कार्यक्रमाची सुरुवात झाली. थोर नाटककार अण्णासाहेब किर्लोस्कर यांचं 'शाकुंतल' हे संगीत नाटक म्हणजे महाकवी कालिदासाच्या 'अभिज्ञान शाकुन्तलम्'चेच मराठी भाषांतर असल्यामुळे या नाटकातल्या या सर्वश्रुत नांदीने कार्यक्रमाची मोठ्या दिमाखात सुरुवात झाली. महाविद्यालयातील प्राध्यापिका सौ. प्रीती साठे-भोळे, सौ. गौरी जोशी आणि मीनल साठे यांनी एकत्र ही नांदी गायली. यानंतर महाकवी कालिदासाच्या संपूर्ण जीवनावर एक संक्षिप्त दृष्टिक्षेप टाकण्यासाठी प्राध्यापिका मीनल साठे आणि सौ. प्रीती साठे यांनी कालिदासाच्या एकूणच जीवनपटाची संक्षिप्त माहिती असलेल्या लेखांचे वाचन केले. त्यांच्या वाचनानंतर महाविद्यालयाचे प्राध्यापक तथा प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख डॉ. श्री. गणेश दिवे यांनी महाकवी कालिदासाची एक इंग्रजीत अनुवादित असलेली कविता सर्वांना आपल्या ओघवत्या वक्तृत्व शैलीत उलगडून दाखवली. या काव्यवाचनाने कार्यक्रमात चांगलीच रंगत आणली. यानंतर महाविद्यालयातील 'दूरसंचार आणि अणुविद्युत अभियांत्रिकी' विभागाच्या प्राध्यापिका सौ. गौरी गोडबोले जोशी यांनीही उत्तम काव्यवाचन केले आणि कार्यक्रमावर रंजकतेचा साज चढवला. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाचे प्रमुख तथा विद्युत अभियांत्रिकी विभागाचे प्राध्यापक श्री. योगेश काटदरे यांनी केले. या संपूर्ण कार्यक्रमाच्या यशस्वीततेकरिता विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, तसेच महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नरेंद्र सोनी, उपप्राचार्य श्री. अविनाश पवार यांचे उत्तम मार्गदर्शन लाभले.



दि. १३ जुलै २०२४ रोजी संगणक अभियांत्रिकी विभागातील सौ. राधिका कदम यांनी ऑनलाईन सत्राद्वारे बारावी विज्ञान शाखेतील आणि डिप्लोमा संगणक विद्यार्थ्यांसाठी 'संगणक अभियांत्रिकी पदविके नंतर उपलब्ध विविध करियर संधी' या विषयावर मार्गदर्शन केले. त्यात त्यांनी आवश्यक असणारी कौशल्ये, तसेच ती कशी विकसिक करावी याविषयी माहिती दिली. 'संगणक अभियांत्रिकीतील करिअरच्या संधी' या शीर्षकाच्या व्याख्यानाला विविध बाह्य महाविद्यालयातील ४२ विद्यार्थी उपस्थित होते. प्रा.कदम यांचे व्याख्यान अत्यंत माहितीपूर्ण आणि नावीन्यपूर्ण ठरले, ज्यात संगणक अभियांत्रिकी पदवीधरांसाठी उपलब्ध करिअरच्या विविध संधींचा समावेश आहे. राष्ट्रीयीकृत बँका, ITI प्रशिक्षक, MPSC आणि UPSC सारख्या सरकारी क्षेत्रातील संधींसह अनेक आशादायक करिअर मार्गांवर भर दिला.




दि. १७ जुलै २०२४ रोजी महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाद्वारे आषाढी एकादशी निमित्त 'अभंग संध्या' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



दि.१८ जुलै २०२४ रोजी, महाविद्यालयातील स्थापत्य अभियांत्रिकी विभाग आणि संस्थात्मक इनोव्हेशन कौन्सिलने Accelerators/Incubation-opportunities for students and faculties- early stage entrepreneurs याविषयावर ऑनलाईन सत्र आयोजित केले. श्री आर्यन वशिष्ठ यांना सत्रासाठी सं-साधन व्यक्ती म्हणून आमंत्रित केले होते. माननीय वक्त्याने संशोधनातील AI तंत्रज्ञानावरील त्यांचे ज्ञान सामायिक केले. त्यांनी AI शक्तीवर चालणाऱ्या साधनांबद्दलची सर्व माहिती सामायिक केली, जी प्रयोगांचे नियोजन करण्यासाठी, डेटा संकलित करण्यासाठी आणि निःपक्षपाती पद्धतीने कार्यक्षमतेने विश्लेषण करण्यासाठी डिझाईन केलेली आहे. हस्तलिखिते लिहिणे आणि संपादित करणे, संबंधित स्रोतांचा हवाला देणे आणि त्यांच्या अभ्यासाच्या व्याप्तीसाठी सर्वांत योग्य जर्नल्स ओळखण्यास मदत करणारी AI साधने देखील यावेळी शिकण्यास मदत झाली.





दि. २५ जुलै २०२४ रोजी रत्नागिरी जिल्हा विज्ञान परिषदेने इयत्ता आठवी ते दहावी इयत्तेच्या विद्यार्थ्यांसाठी 'कृत्रिम बुद्धिमत्तेचे फायदे आणि तोटे' या विषयावर भाषण स्पर्धा आयोजित केली होती. संगणक अभियांत्रिकी विभागातील प्रा.राधिका कदम

या तालुकास्तरीय भाषण स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून उपस्थित होत्या. या स्पर्धेतून २ विद्यार्थी जिल्हा स्तरावर पोहोचले आहेत. गुहागर गटशिक्षण अधिकारी सौ.भागवत या कार्यक्रमाला उपस्थित होत्या.




दिनांक २७ जुलै २०२४ रोजी सकाळी ११:१५ वाजता ऑनलाईन गूगल मीट द्वारे इलेक्ट्रॉनिक्स आणि संगणक अभियांत्रिकी विभागाने इनोवेशन कौन्सिलच्या सहकार्याने 'इलेक्ट्रॉनिक्स आणि संगणक अभियांत्रिकीतील करिअर संधी' या विषयावर मार्गदर्शनपर संवाद आयोजित केला होता. या संवादात इलेक्ट्रॉनिक्स आणि संगणक अभियांत्रिकी विभागातील सहाय्यक प्रा. गौरी जोशी यांनी विद्यार्थ्यांना या नवीन शाखेतील विविध करिअर संधींची माहिती दिली. प्रमुख आंतरराष्ट्रीय कंपन्या, तसेच इस्रो, डीआरडीओ, बीईएल, बी.एस.एन.एल. यांसारख्या सरकारी संस्थांमधील नोकरीच्या संधींची माहिती देण्यात आली. एकूण ४० विद्यार्थी या कार्यक्रमाला उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरं देऊन सौ. जोशी यांनी त्यांचे शंका निरसन केले.




दि. २७ जुलै २०२४ रोजी महाविद्यालयातील विद्युत अभियांत्रिकी विभागाद्वारे कनिष्ठ महाविद्यालय, शिरगाव – चिपळूण येथे 'विद्युत वायरिंग आणि सुरक्षा' विषयावर कार्यशाळा आयोजित केली. सर्व प्रथम विद्युत विभागातील सहाय्यक प्रा. प्रीती साठे भोळे यांनी, 'विद्युत वायरिंगची मूलभूत माहिती, केबलची रचना, आकारमान, रंगसंगती (फेज, न्यूट्रल आणि अर्थिंगसाठी)' यांचे विवेचन केले. त्यानंतर त्यांनी स्टेअर्केस वायरिंगचे डायग्रॅम दर्शविले आणि प्रत्यक्ष वायरिंग मॉडेल द्वारे हाताने शिकवण दिली. त्यानंतर, विद्युत विभागाचे प्रा.योगेश काटदरे यांनी विद्युत सुरक्षा आणि संबंधित मार्गदर्शक तत्त्वांवर व्याख्यान दिले. त्यांनी सुरक्षा विषयावर एक आकर्षक ॲनिमेटेड व्हिडिओ देखील प्रदर्शित केला. प्रस्तुत कार्यशाळेच्या यशस्वीतते करिता विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नरेंद्र सोनी, श्री.अविनाश पवार (उपप्राचार्य) आणि श्री.सतीश घोरपडे (इलेक्ट्रिकल विभागाचे प्रमुख) यांचे मार्गदर्शन प्राप्त झाले. तसेच कनिष्ठ महाविद्यालय, शिरगाव – चिपळूणच्या प्रा.. सनदी आणि श्री. जाधव यांचे सहकार्य देखील महत्त्वाचे ठरले. कार्यशाळेच्या समाप्तीनंतर प्रा. योगेश काटदरे यांनी 'इलेक्ट्रिकल अभियांत्रिकीसाठी करिअरच्या संधी' याविषयावर विशेष व्याख्यान दिले. त्यांनी विद्यार्थ्यांना करियर संदर्भात विस्तृत माहिती दिली. उद्योगातील मागणी, नवकल्पना आणि आवश्यक कौशल्यांची चर्चा केली. प्रस्तुत दोन्ही कार्यक्रमांसाठी कनिष्ठ महाविद्यालय, शिरगाव-चिपळूणचे अकरावी, बारावीचे सुमारे दीडशे विद्यार्थी उत्साहाने सहभागी झाले होते.

दिनांक २८ जुलै २०२४ रोजी महाविद्यालयातील प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभागाचे विभागप्रमुख डॉ. गणेश दिवे यांनी खारवी समाज समिती तालुका गुहागर आयोजित मेळाव्यामध्ये, 'शिक्षणातून समाज

परिवर्तन' या विषयावर व्याख्यान दिले. यामध्ये डॉ. गणेश दिवे यांनी १० वी आणि १२ वी नंतर उपलब्ध शिक्षणाच्या संधी, शिक्षणामुळे आयुष्यामध्ये कसा आमुलाग्र बदल होतो, आपले भविष्य कसे उज्ज्वल बनवू शकतो याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले.



प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभागातील प्रा.अरुण सरगर यांनी Department of Mathematics at Koneru Lakshmaiah Educational Foundation(Deemed to be University), Bachupally Campus, Hyderabad आयोजित पाच दिवसांची International Online FDP on Exploring Recent Trends in Applied Mathematics and Machine Learning या विषयावर कार्यशाळा पूर्ण केली.




दिनांक ३१ जुलै २०२४ रोजी 'सायबर धोके आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान (सायबर त्रिटस आणि इमर्जिंग ट्रेंड्स)' या संदर्भात ऑनलाईन नॅशनल वेबिनारचे आयोजन केले. या वेबिनारमध्ये ४५० पेक्षा अधिक जण उपस्थित होते. गुगल मीट आणि यूट्यूब लाईव्ह स्ट्रीमिंगद्वारे आयोजित केलेल्या या कार्यक्रमात डॉ. एन. कला भास्कर यांनी आपल्या ज्ञानाच्या आधारावर 'सायबर धोके, उभरत्या तंत्रज्ञानाचे महत्त्व आणि सुरक्षा उपाय' यावर सविस्तर माहिती दिली. डॉ. एन. कला भास्कर या मद्रास युनिव्हर्सिटीच्या सेंटर फॉर सायबर फॉरेन्सिक आणि इन्फॉर्मेशन सिक्युरिटी मध्ये प्राध्यापिका आहेत. वेबिनारमध्ये तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील नवीनतम ट्रेंड्सवर चर्चा करण्यात आली आणि सहभागींच्या प्रश्नांची उत्तरे दिली गेली. जवळ जवळ २ तास चाललेल्या या विबिनार मध्ये अतिशय महत्त्वपूर्ण विषयावर डॉ. कला बास्कर यांनी मार्गदर्शन केले. हा वेबिनार महत्त्वपूर्ण होता आणि उपस्थितांनी त्याला अत्यंत सकारात्मक प्रतिसाद दिला. इलेक्ट्रॉनिक आणि कॉम्प्युटर अभियांत्रिकी विभागातील प्रा.अपर्णा मुरकर यांनी या सत्राचे नियोजन केले.




•••

Posting under the Reg No MH/MR/TNC 27/2004 2006

Vidya Prasarak Mandal's

# College of Engineering, Thane




## Courses Offered

- Automation and Robotics
- Computer Engineering
- Electrical Engineering
- Electronics & Telecommunication Engineering
- Information Technology

## Why VPMCOE?

- Experienced Faculty
- Robust Curriculum
- Adequate Infrastructure
- Well Equipped Laboratories
- Industry Collaboration
- Research Opportunities
- Student Support Services
- Entrepreneurship & Innovation
- Industry Exposure

**Vidya Prasarak Mandal's College of Engineering, Thane**
'Jnanadweepa' Bldg No.1, Thane College Campus, Thane (W) 400 601
◈Approved By AICTE, New Delhi ◈Affiliated to University of Mumbai
Tel No: +91 - 9619651156
E-mail : vpmcoethane@vpmthane.org

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे – ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे–४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे – ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.